

# परिचय

ड्यूमाच्या 'तीन शिलेदार' ह्या कादंबरीचा आस्वाद विद्यार्थीवर्गाला घेतां यावा म्हणून सदर कथा सारांशरूपानें मीं सादर केली. आज त्याच कादंबरीकाराची दुसरी कथा 'वीस वर्षांनंतर' विद्यार्थीवर्गाच्या हातीं देतांना मला आनंद होत आहे.


ह्या कथेंत इंग्लिश राज्यक्रांतीचा रोमांचकारी भाग आला असल्यानें ८ ते १० इयत्तांपर्यंतच्या विद्यार्थ्यांना ही कथा निःसंशय वाचनीय वाटेल.

सौ. उषा आपटे

BVBK-0402824

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | धनी आणि नोकर | ... | ९ |
| २ | गांठ पडे ठका ठका ! | ... | १५ |
| ३ | राजकीय कैदी | ... | २४ |
| ४ | इंग्लंडची दुर्दैवी राणी | ... | ३० |
| ५ | एक जुनी हकीकत | ... | ३६ |
| ६ | डार्टांची हिकमत | ... | ४२ |
| ७ | इंग्लंडचा दुर्दैवी राजा | ... | ४६ |
| ८ | मोर्डांच्या हातावर तुरी | ... | ५३ |
| ९ | चार्लसची फांशी | ... | ६० |
| १० | धडाड् धूम ! | ... | ६६ |
| ११ | डार्टांची अटक आणि ऑथाची फसगत | | ७३ |
| १२ | सुटका ! | ... | ८१ |
| १३ | राणीची सही व लोकपक्षाचा विजय | | ८८ |

२८२४ दिनांक




BVBK-0402824

# अलेक्झांडर ड्यूमा

जगाच्या वाङ्मयांत ज्या कांहीं लेखकांचीं नांवें चिरकाल टिकून राहतील त्यांपैकीं ड्यूमा ह्याचें नांव एक होय. दिनांक २४ जुलै, १८०२ दिवशीं एका गरीब फ्रेंच लष्करी शिपायाच्या घरीं त्याचा जन्म झाला. त्याच्या बापाचें मूळचें घराणें सरदाराचें, पण ह्याच्या जन्माच्या आधीं त्याला दारिद्र्य आलेलें होतें. त्यामुळें ह्याला नीट शिक्षण मिळणें कठीणच होतें. परंतु सुदैवानें ह्याची चलाख बुद्धि एका धर्मगुरूच्या लक्षांत येऊन त्यानें ह्याला उत्तम तऱ्हेचें शिक्षण दिलें. निर्वाहाला कांहींतरी साधन असावें म्हणून ह्यानें पुढें कायद्याचा अभ्यास केला. पण त्याचें मन कांहीं त्यांत रमेना. लेखन-वाचनाकडे विशेष ओढा असल्यामुळें वकिलीच्या धंद्यांत न पडतां लेखनावरच आपला चरितार्थ चालविण्याचें ठरवून तो फ्रान्सची राजधानी पॅरीस येथें आला.

ड्यूमाच्या लेखनाला गोष्टी, शब्दचित्रें व नाटकें ह्यांपासून प्रारंभ झाला. ' तिसरा हेन्री ' ह्या नाटकामुळें तो विशेष प्रसिद्धीला आला. ज्या कादंबरीलेखनामुळें त्याचें नांव चिरस्मरणीय झालें आहे, तें त्यानें फार उशीरां—वयाच्या बेचाळिसाव्या वर्षीं—सुरू केलें. ' तीन शिलेदार ' ही त्याची पहिलीच कादंबरी. ह्या कादंबरीनें त्याला अफाट कीर्ति मिळवून दिली. त्यानें त्यानंतर भराभर एकामागून एक अनेक कादंबऱ्या लिहिल्या. आपल्याकडे ' ऐतिहासिक कादंबरी ' म्हटली म्हणजे जसें हरिभाऊ आपट्यांचें नांव डोळयांपुढें चटकन् उभें राहातें, तसेंच फ्रेंच भाषेंत ड्यूमाचें. आपण १२०० पुस्तकें लिहिलीं आहेत असें त्यानें त्या वेळचा फ्रान्सचा बादशाह तिसरा नेपोलियन ह्याला सांगितल्याचें प्रसिद्ध आहे. फ्रेंच भाषेंत त्याचें जें समग्र वाङ्मय छापलें आहे त्याचे मोठ-मोठे असे २२७ खंड आहेत. त्याच्या अफाट लेखनाची ह्यावरून कल्पना येईल.


ड्यूमानें आपल्या अफाट लेखनाप्रमाणें अफाट कीर्तीही मिळविली. पण त्या मानानें सुख असें त्याला कधींच मिळालें नाहीं. ' आव जाव, घर तुमारा ' अशी त्याची वृत्ति असल्यामुळें त्याच्याभोंवतीं त्याच्या पैशावर मजा मारणाऱ्या खुशालचेंडूंचा गोतावळा फार. त्यामुळें शेवटपर्यंत सावकारांच्या कचाट्यांतच तो राहिला. त्याचें लेखन कर्जफेडीसाठींच चाललें असें म्हटलें तरी चालेल. वयाच्या ६८ व्या वर्षीं—५ डिसेंबर, १८७०—तो आपल्या मुलाच्या घरीं अत्यंत वैतागलेल्या स्थितींत निधन पावला. एवढी थोर वाङ्मयसंपत्ति मागें ठेवणाऱ्या ह्या लेखकाचा जन्मही दारिद्र्यांत व्हावा आणि शेवटही दारिद्र्यांतच व्हावा ही एकपरी विलक्षण विधिघटनाच होय.



# कथासूत्र

आमच्या 'तीन शिलेदार' ह्या कथेंतील प्रसंगांना आतां वीस वर्षें होऊन गेलीं आहेत. मुलांनो, तुमचा आवडता शिलेदार डार्टा आतां पंचेचाळीस वर्षांचा झाला आहे. त्याची उमेद, तडफ मात्र तीच कायम आहे हं! फ्रान्सचा राजा १३ वा लुई मरून गेला, त्याचा महत्त्वाकांक्षी प्रधान रिचल्यूही मरण पावला. आज फ्रान्सवर त्याची बायको ॲन राज्य करीत आहे, राजपुत्र १४ वा लुई अल्पवयी आहे व रिचल्यूची जागा 'माझारीन' ह्या कद्रू इटालियन मनुष्यानें घेतली आहे. राणीवर त्याचा चांगला पगडा असल्यानें गरीब प्रजेला नाडून तो आपली तुंबडी भरीत आहे आणि ह्यामुळें जनता त्याला व राणीला शिव्याशाप देत आहे. ह्या दुकलीविरुद्ध बंड करण्याचीही तिची तयारी आहे. प्रजापक्षाचें वजन दिवसेंदिवस वाढीला लागत असून त्याचें नेतृत्व काँड नांवाच्या व्यक्तीकडे आहे. पूर्वीचा डार्टाचा शत्रु रोशफोर ह्या पक्षाला मिळाला आहे. राजपक्षाचें बळ दिवसेंदिवस कमी होऊं लागलें आहे

आणि ह्याला कारण माझारीनचा स्वार्थ! अशा ह्या धामधुमीच्या काळांतच आमच्या कथानकाला सुरुवात होत आहे. आमच्या गेल्या कथानकानंतर वीस वर्षांनीं फिरून आपण फ्रान्स व इंग्लंडच्या राजकारणांत शिरत आहोंत.





प्रकरण पहिलें

# धनी आणि नोकर

ठोऽऽ ठोऽऽऽ बंदुकीचे बार ऐकूं आले. "माझारीनचा धिक्कार असो" ही आरोळी पण माझारीनच्या कानीं आली. तो आपल्या वाड्यांत माडीवर एकान्तांत बसला होता. प्रजेंत वाढलेल्या असंतोषाचा निदर्शक असा कोलाहल ऐकून तो पुटपुटला, "मी इटालियन म्हणून हे नीच लोक माझा द्वेष करतात, दुसरं काय? पण माझं हे काय वाकडं करणार आहेत?" त्यानें एकदा आपल्या द्रव्यसंग्रहाकडे नजर टाकली. "ह्या कद्रूनें गिळंकृत केलेला पैसा त्याचं पोट फोडून बाहेर काढा!" कोणातरी माथेफिरूचे हे शब्द सरळ त्याच्या कानांवर येऊन आदळले व फिरून त्यानें भेदरलेल्या नजरेनें एकदा आपल्या तिजोरीकडे पाहिलें. माझारीनला प्राणांपेक्षांही ही तिजोरी प्यार होती.

ठण् ठण् .... त्याच्या समोरील प्रचंड घड्याळांत दहाचे ठोके पडतांच तो दचकला. "बोनोंई! बोनोंई!!" त्यानें आपल्या खाजगी कारभाऱ्याला हाक मारली. तत्काळ काळ्या पोषाखांतील एक व्यक्ति त्याच्या पुढें येऊन उभी राहिली.

"बोर्नोई, आज वाड्यांत कोणते शिलेदार हजर आहेत?"

"डार्टीच्या आधिपत्याखालील शिलेदार आहेत, महाराज!"

"मान्सीर डार्टा इथें आहे काय?"

"आहे महाराज!"

"जा, त्याला पाठवून दे पाहूं."

डार्टा आंत येतांच माझारीन म्हणाला, "डार्टा, तुम्ही मोठे शूर व इमानी आहांत, असा मी तुमचा लौकिक आजपर्यंत ऐकत आलों आहें."

"आज ह्या चिकट्याचं कांहीं तरी काम दिसतं आहे." डार्टा मनाशीं म्हणाला व मग माझारीनला लवून मुजरा करून तो म्हणतो, "माझी गरिबाची कामगिरी महाराजांच्या लक्षांत आली हें मी माझं भाग्य समजतों."

"तुम्हीं पूर्वीं राणीची एक मोठी महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे असं मी ऐकतों. आज तुम्हीं माझी एक तितकीच महत्त्वाची कामगिरी पार पाडायची आहे. पाहूं तुमचं कसब!"

"पाहावीच महाराजांनीं एकदा ह्या सेवकाची करामत!" डार्टा नम्रपणें उत्तरला.

"राणीची कामगिरी तुम्हीं आणि तुमच्या स्नेह्यांनीं मिळून पार पाडली, नाहीं? तुमचे ते दोस्त हल्लीं कुठें असतात?"

"राणीची कामगिरी! स्नेही!!" डार्टा मुद्रेवर शक्य तेवढें आश्चर्य आणून म्हणतो, "महाराज, आपण काय म्हणतां त्याची मला कांहींच कल्पना येत नाहीं."

"डार्टा, या लपवालपवीचा कांहीं उपयोग नाहीं. आपले उरलेले तीन स्नेही कुठें आहेत? मला सर्व कांहीं माहीत आहे. आपल्या टाळाटाळीचा कांहीं एक उपयोग नाहीं."

"तरुण वयांत तीनच काय पण भेटतील तितक्या व्यक्ति मित्र होऊं शकतात महाराज !"

"मान्सीर डार्टा, राणीला भिऊन ही गोष्ट लपवायचं तुम्हांला मुळींच कारण नाहीं. राणीनें तुमच्या कामगिरीबद्दल तुम्हांला बक्षीस दिलेली व तुम्हीं विकून टाकलेली आंगठी आज माझ्या हातीं आहे. एवढी माहिती दिल्यानंतर आपण आतां जास्त आढेवेढे घेणार नाहीं अशी आशा आहे."

"महाराज, माझ्या जुन्या मित्रांचा नक्की पत्ता मला माहीत नाहीं, पण आपली इच्छाच असेल तर त्या दृष्टीनें मी कांहीं प्रयत्न करून पाहीन." माझारीनच्या भाषणानें विरघळलेला डार्टा म्हणाला.

"मग करा सुरुवात. तुमची पहिली कामगिरी हीच !"

"त्यांना हुडकण्यासाठीं कदाचित् सारा फ्रान्स पालथा घालावा लागेल आणि ह्या घटकेला मजजवळ फुटकी कवडीही नाहीं." डार्टा कुरकुरला. ह्या निमित्तानें माझारीनला कांहीं गंडा घालतां आल्यास तो पाहात होता.

"एवढंच ना ! ही घ्या थैली !!" डार्टानें तत्काळ थैली हस्तगत केली व माझारीनची रजा घेऊन तो खालीं चौकांत आला. चौकांतील दिव्याच्या उजेडांत थैली सोडून त्यानें आंतील पैसे मोजून पाहिले. ते फक्त शंभर पिस्टोल होते. "ह्या शंभर चांदीच्या तुकड्यांवर हा चिक्कू मला राबवूं पाहात आहे काय ? ठीक ! नाहीं होणार म्हणावें बेट्याला." डार्टा स्वगत पुटपुटला व आपल्या वसतिस्थानाकडे निघाला. डार्टा आपल्या पथिकाश्रमापाशीं येऊन पोचला त्या वेळीं तेथें लोकांची एकच गर्दी उसळलेली त्याला दिसून आली. ह्या गर्दीत सरकारी शिपायांचा बराच भरणा असल्यानें डार्टाची उत्सुकता विशेष वाढली. सरकारी पहाऱ्यांतून चाललेल्या एका गाडीवर लोकांनीं हल्ला चढविला व ह्या दंगेखोरांचा

पुढारी येथेंच कोठेंतरी दडून बसला आहे, अशी माहिती त्याला मिळाली. रात्र बरीच झाली असल्यानें विशेष पंचाईत न करतां डार्टानें आपली खोली गांठली. खाणावळबाईला आपलें भोजन व दिवा वर खोलींतच पाठवून घायला त्यानें सांगितलें.

मेणबत्तीच्या मंद प्रकाशांत त्यानें आपल्या सर्व जुन्या कागदपत्रांची



उलथापालथ करून पाहिली, पण त्याच्या मित्रमंडळीचा पत्ता सांगणारं एकही चिटोरें अगर पत्र त्यांत निघालें नाहीं, तेव्हां मोठ्या निराश मनानें त्यानें भोजनाला आरंभ केला आणि अगदीं ह्याच क्षणाला खोलीच्या खिडकींतून एक डोकें आंत आलें.

“ अरे चोरा ! माझ्या शंभर पिस्टोलवर तुझी नजर आहे, होय ?” चोरून डोकावणाऱ्या त्या व्यक्तीची मानगूट पकडून डार्टा ओरडला.

“ महाराज, गरिबावर दया करा. निदान माझं म्हणणं तरी ऐकून घ्या ! ” ती व्यक्ति गयावया करून म्हणाली.

“ कोण प्लँशे ? अरे लेका ! आणि हा काय धंदा चालवला आहेस ? ” डार्टा त्या व्यक्तीची मानगूट सोडून ओरडला.

आपणांला आपल्या जुन्या धन्यानेंच पकडलेलें पाहून प्लँशेला अत्यंत आनंद झाला.

“ महाराज ....”

“ लेका रात्रींच्या वेळीं असा चोरून लोकांच्या खोल्यांतून डोकावीत कां निघाला आहेस ? ”

“ महाराज, रोशफोर आपला जुना वैरी आतां लोकांचा पुढारी आहे. त्याला आतांच आम्हीं सरकारी पहाऱ्यांतून सोडवलं पण शिपायांचा माझ्यावर दांत असल्यानें मी इथें माळ्यावर दडून बसलों होतों. ”

“ मूर्खा, सरकारी लोकांच्या हातीं लागलास तर तुझी चटणी उडेल आणि माझी नोकरी जाईल. बरं, खा दोन घास इथें माझ्याबरोबरच. मग पाहूं काय करायचं तें. ” प्लँशे भुकेलेला होताच. त्यानें अन्नावर यथास्थित तोंडसुख घ्यायला सुरुवात केली.

“ काय रे प्लँशे, तूं तर आतां पुढारी झालास, पण माझ्या जुन्या स्नेह्यांपैकीं तुला कोणी कधीं भेटले होते का ? ”

“ नाहीं महाराज. पण अरामींचा नोकर बेंझी मात्र इथल्या मठांत चोपदार आहे, तो मला नेहमीं भेटतो. त्याला अरामींचा पत्ता नक्की माहीत असेल. ”

डार्टा आपले कपडे घालून बाहेर जायला सज्ज झाल्याचें पाहून प्लँशेची गाळण उडाली. तो गयावया करून म्हणाला, "महाराज, मला असाच एकट्याला सोडून तुम्ही जाणार?"

"बेट्या, चिंता करूं नकोस. माझी खाणावळवाली मॉडेली बाई मोठी विश्वासू आहे; ती तुला दगा देणार नाहीं. खुशाल आराम कर. मी तिला सांगून जात आहें."





प्रकरण दुसरें

# गांठ पडे ठका ठका !

प्लँशेनें सांगितलेला मठ हां हां म्हणतां डार्टानें गांठला. मठांतील धार्मिक कार्यक्रम नुकताच आटोपला होता व भाविक लोकांची पांगापांग सुरू होती.

"ह्या बेट्या जेजुइटांना प्रार्थनेशिवाय कांहीं दिसतच नाहीं," इतक्या अपरात्रीं प्रार्थनामंदिरांतील ती वर्दळ पाहून डार्टा चडफडला. इतक्यांत मठाच्या चोपदाराकडे त्याचें लक्ष गेलें. खरोखरच तो बेंझी होता. आपल्या डगल्याच्या व रुप्याच्या काठीच्या जोरांतच तो होता.

"श्ऽऽश्ऽऽ" त्याच्या डगल्याचें टोक ओढून डार्टा म्हणाला.

"कोण ? मान्सीर डार्टा ? .... अरे देवा !" कांहीं तरी घातापत झाल्याप्रमाणें बेंझी विव्हळला.

"जुन्या दोस्ताचं स्वागत करण्याची ही कुठली तऱ्हा बेंझी ?" डार्टा हसून म्हणाला.

"जो आपल्याला मुक्ति मिळवून देण्याला मदत करतो तोच खरा मित्र, आपल्या भोवतालचे पाश वाढवितो तो नव्हे !" इरसाल

ख्रिस्तभक्ताप्रमाणें बेंझी उद्गारला. बेंझीकडे डार्टाचें कांहीं काम नसतें तर ह्या उद्गारांबद्दल त्या ढोंगी चोपदाराची बत्तिशी त्यानें केव्हांच सैल केली असती. पण आतां त्याला गप्प बसणें भाग होतें.

"जाऊं दे रे बेंझी! मी तुझ्या मुक्तीच्या आड येत नाहीं, पण तुझा धनी कुठें आहे तें तरी सांगशील!"

"आपल्या उचापतीमुळें त्यांचीही मुक्ति जायची, त्यांचा पत्ता मला माहीत नाहीं हें एक प्रकारें बरंच झालं म्हणायचं!"

बेंझीचें प्रकरण लेचेंपेचें नाहीं हें डार्टानें तत्काळ ओळखलें. हा बगळा सरळ मार्गानें हार जात नाहीं एवढें कळतांच डार्टानें दुसरा उपाय काढला. त्याच्या मुठींत कांहीं नाणीं कोंबीत तो म्हणतो, "अरे, जुना स्नेही म्हणून मला त्याला भेटायचं आहे, माझं त्याच्याशीं दुसरं कांहीं काम नाहीं."

बेंझी पुरा खट होता. त्यानें तीं नाणीं झिडकारून टाकलीं आणि सरळ आपल्या खोलीचा रस्ता धरला.

डार्टा पुरा चाट झाला. "अरे लुच्च्या ठका!" तो पुटपुटला.

डार्टा हळूच तेथेंच छपून बसला. बेंझीचा पुरा पिच्छा पुरविण्याचा त्याचा निश्चय झाला होता.

थोड्याच वेळांत बेंझी खोलींतून बाहेर पडला व आपणावर कोणाची पाळत आहे कीं काय ह्याचा कानोसा घेत मठाबाहेर पडला. डार्टानें त्याला शंका न येईल अशा बेतानें त्याचा पाठलाग सुरू केला.

थोड्याच वेळांत बेंझीनें एका तबेल्यापाशीं येऊन एक घोडा भाड्यानें घेऊन प्रयाण केलें. तो जातांच डार्टा त्या तबेल्यापाशीं आला व तेथील पोऱ्याला त्यानें विचारलें,

"हा चोपदार कुठें गेला रे आतां?"

" नाईसला गेला. "

" नाईसला काय मठबीठ आहे काय एकादा ? "

" अहो, जेजुइटांचा प्रसिद्ध मोठा मठ तिथेंच आहे ना ! "

" असं का ! " एवढेंच म्हणून डार्टा तेथून निसटला. अरामीला आपण आतां खास गांठूं शकूं असें त्याला वाटूं लागलें.

नाईसला रात्रींच पोचणें श्रेयस्कर वाटल्यानें दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं डार्टानें प्लँशेसह पारीस सोडून नाईसच्या दिशेनें आपले घोडे दवडले. ह्या खेड्यांत वस्ती अशी फारशी नव्हतीच. मुख्य मठाच्या भोंवतालीं जीं काय चार घरें दिसत होतीं तेवढींच.

" प्लँशे, नीट लक्ष ठेव. हा बेंझ्या रोज रात्रीं इथें आपल्या धन्याकडे येत असला पाहिजे. " डार्टा म्हणाला.

इतक्यांत त्यांना घोड्याच्या टापा ऐकूं आल्यानें ते दोघेही तेथेंच एका घराच्या आडोशाला उभे राहिले.

" बेंझीच तो ! " घोड्यावरून येणाऱ्या व्यक्तीला अंधारांतून शक्य तितकें निरखीत प्लँशे पुटपुटला.

" अरे ढोंग्या, आतां पाहातों तुझा धनी कसा सापडत नाहीं तें ! " डार्टा म्हणाला.

बेंझीनें एका घरापुढें आपला घोडा उभा केला व खालीं उडी टाकली. डार्टानें तत्काळ त्याची मानगूट पकडली. " मेरे प्यारे दोस्त, आतां खोटं बोलून तुझं कांहीं चालणार नाहीं. "

" धर्माच्या कार्यासाठीं, खोटं बोलणं हेंही पुण्यच आहे. " बेंझी निर्लज्जपणें म्हणाला.


" बस्स कर तुझी बडबड ! " डार्टा त्याच्यावर खेकसला, " अरामी ! अरामी ! ! "

" ओऽहो ! मान्सीर डार्टा ! तूं नि इतक्या अपरात्रीं इथें कुठें ? " अरामी दार उघडून बाहेर येतां येतां म्हणाला.

" तुझा हा लुच्चा नोकर कांहीं थांगपत्ता लागूं देत नव्हता. पण म्हटलं घ्यावीच तुझी एकदा गांठ ! "

" भल्या गृहस्था, आंत तरी ये. मग बसूं खुशाल गप्पा मारीत. "

सर्व मंडळी आंत आली. घरांतील एकंदर थाटमाट पाहून डार्टा थंडच झाला. अरामी म्हणजे एक बडें प्रस्थ झालें असावें अशी त्याची खात्री झाली.



" निव्वळ धर्मोपदेशक म्हणून तूं ही पुंजी गोळा केलीस ? " न राहवल्यामुळें डार्टानें विचारलें.

" बाबा, हीं प्रत्येकाचीं खाजगी रहस्यं आहेत ... हाऽ हाऽऽ " अरामी हसून म्हणाला.

" बरं, जाऊं दे तें: मी आज एका विशेष कामासाठीं आलों आहें. माझारीनच्या मनांत आपणाला कांहीं कामगिरी सांगायची आहे. मला वाटतं आपण ती पार पाडली तर आपला बराच फायदा होईल. "

" नाहीं रे बाबा मी ह्या भानगडींत आतां पडणार! माझा धर्मोपदेशकाचा पेशा आहे तो ठीक आहे. शिवाय सध्या राजकारणांत दुफळी आहे. माझारीन व राणी एका बाजूला, तर अल्पवयी राजपुत्राला ताब्यांत घेऊन ह्या दुकलीचं उच्चाटण करायला टपलेल्या काँडचा पक्ष एका बाजूला. असंतुष्ट जनतेचंही पाठबळ त्यालाच. अशा स्थितींत मी ह्या भानगडींत पडायला मुळींच तयार नाहीं. "

" म्हणजे तूं माझारीनला साहाय्य करायला तयार नाहींस? " डार्टा निराशेनें म्हणाला.

" नाहीं बुवा, आणि मला असं वाटतं कीं तूंही ह्या फंदांत पडूं नयेस. तुला स्वस्थ राहवतच नसेल तर काँडलाच कांहीं मदत करतां आली तर पाहा! "

' अरे लुच्च्या! एकंदरींत तूं काँड पक्षांत आहेस तर! म्हणून ही टोलवाटोलवी काय?' डार्टा मनाशीं म्हणाला.

" बरं. पार्थोची वार्ता काय? " तो विचारतो.

" तो तर आतां बडा जमीनदार होऊन बसला आहे. तो पिकार्डला असतो. "

" वाऽऽ मला त्याला भेटायचं आहे. बरं मग घेतों रजा. "

दोघाही मित्रांनीं परस्परांचा हात प्रेमानें दाबला. थोड्याच वेळांत डार्टा व प्लँशे ह्यांचे घोडे पिकार्डच्या दिशेनें दौडत निघाले.

उजाडतां उजाडतां पिकार्डच्या भव्य किल्ल्यापाशीं ते आले.

" ओऽ होऽ हा किल्ला जर पार्थोच्या मालकीचा असेल तर मोठीच मौज झाली म्हणायची ! " प्लँशे ओरडला.

" चूप बस मूर्खा ! पार्थो पार्थो काय म्हणतोस ? तो आतां मोठा सरदार झालेला दिसतोय. "

इतक्यांत एक घोडेस्वार त्यांच्या दृष्टीला पडला. त्याच्या भोवतीं शेतकऱ्यांचा गराडा पडला असून ते त्याच्याशीं मोठ्या अदबीनें बोलत होते.

" हा पार्थो तर नसेल ? " डार्टा हळूच म्हणाला.

" शक्य नाहीं, पार्थोची भव्य शरीरयष्टि कुणीकडे आणि हा खुजा कुणीकडे ! " प्लँशे उत्तरला.

" ओ ऽ हो ! महाराज, हा तर पार्थोचा नोकर माझा दोस्त मास्कटाँ ! " प्लँशे आनंदातिशयानें ओरडला. प्लँशेचे हे उद्गार स्वाभाविकच घोड्यावर बसून शेतकऱ्यांशीं बोलणाऱ्या त्या इसमाच्या कानांवर गेले व त्यानें ह्या दोघांकडे वळून पाहिलें. डार्टा व प्लँशे ही जोडी दिसतांच त्यानें ताडकन् घोड्यावरून उडी मारली व " मान्शर डार्टा ! मान्शर डार्टा !! " असें आनंदानें ओरडतच तो डार्टाकडे धावत आला.

" अरे वा ऽ मास्कटाँ, तुझा दिमाख तर खूपच वाढला आहे. पण काय रे, तुझा धनी कुठें आहे ? "

" थांबा महाराज. ही आनंदाची बातमी प्रथम मी त्यांना कळवणार. ह्या आनंदाच्या प्रसंगाचं श्रेय मी घेणार ! " असें म्हणत मास्कटाँ धावतच सुटला. मास्कटाँची ही धांदल पाहून डार्टाला मोठी मजा वाटली. थोड्याच वेळांत पार्थो त्यांना सामोरा आला व सर्व मंडळी किल्ल्यांत गेली. स्वयंपाकघराच्या दिशेनें आलेला खमंग वास हुंगून प्लँशे हळूच म्हणाला, " पार्थोचं काम कांहीं न्यारंच आहे. त्यानें इतक्यांत मेजवानीचीही सिद्धता केली वाटतं ! " डार्टानें एकेक डोळा एवढाला करून त्याच्याकडे पाहिलें. त्यामुळें त्याला आपलें भाषण जरा आवरतें घ्यावें लागलें.

पार्थाचें वैभव एखाद्या राजासारखें होतें. तेथें कशाचीच कमतरता नव्हती. ह्यामुळें पार्था फिरून आपल्याबरोबर येईल किंवा नाहीं ह्याची डार्टाला शंकाच होती, तरी पण डार्टानें खडा टाकून पाहाण्याचें ठरविलें. " काय रे पार्था, मला वाटतं आतां फिरून कंबरेला तरवार कसून घोड्यावर स्वार होण्याचं तुझ्या कांहीं मनांत येणार नाहीं. ह्या ऐश्वर्यांत राहून तूं जरा गंजल्यागत झाला असशील नाहीं ? "

" कां रे बाबा, असं कां म्हणतोस ? माझी साहसाची आवड जशीच्या तशी शाबूत आहे. ना बायको, ना पोर. काढ कामगिरी एखादी आणि मग पाहा या पार्थाची मजा. "

" फार उत्तम. मी त्यासाठींच आलों आहें. माझारीनला आपली जरूर आहे. बघ येत असलास तर. "

" जरूर येईन मी तिथें. पण एक गोष्ट लक्षांत ठेव, मला पैशाची कांहीं जरूरी नाहीं, पण त्या चिकट इटालियनानें मला बॅरनसारखा एखादा हुद्दा जरूर दिला पाहिजे. तसं असेल तरच आपण त्याच्या फंदांत पडूं. "

" तें माझ्याकडे लागलं, " डार्टा आनंदानें म्हणाला व मद्याचा एक चषक त्यानें घटकन् पिऊन टाकला.

" पण काय रे, आपल्या इतर मित्रांना तूं भेटलास का आधीं ? "

" अरामीला भेटलों, पण तो आतां कट्टा जेजुइट झाला आहे. शिलेदार बनण्याचं आतां तो मुळींच मनावर घ्यायला तयार नाहीं. "

" ऑथा काय म्हणतो ? "

" त्याचा पत्ताच मला माहीत नाहीं. "

" तो ब्लाईला राहातो. तो आतां काउंट झाला आहे. "

" मग मी उद्यांच त्याची गांठ घेतों. "

" पण काय रे, माझारीनचं हें काम आहे तरी काय? आणि तें संपणार केव्हां?"

" मला तरी त्याची नीटशी कल्पना कुठें आहे? पारीसला गेल्यावर पाहूं सावकाश." डार्टा म्हणाला.

दुसऱ्या दिवशीं ठरल्याप्रमाणें पार्थाचा मोठ्या प्रेमानें निरोप घेऊन डार्टा ब्लाईकडे रवाना झाला. वाटेंत डार्टाच्या मनांत ऑथासंबंधीं अनेक विचार येत होते. ऑथा स्वभावाचा उमदा होता, दिलदार होता, पण त्याचें मद्याचें व्यसन दांडगें होतें. ऑथा आतां चांगलाच मद्यपी बनला असावा अशीही एक शंका डार्टाला निष्कारणच येऊन गेली. ब्लाईला तो ऑथाच्या प्रशस्त प्रासादापुढें येऊन उभा राहीपर्यंत डार्टाच्या मनांतील विकल्प दूर झाला नव्हता. प्लँशेनें पुढें होऊन " काउंट ऑथा इथेंच असतात ना?" अशी पहारेवाल्याकडे चौकशी करण्यास आणि ऑथाची गंभीर व प्रशस्त मूर्ति तेथें येण्यास एकच गांठ पडली.

" तुम्हांला कुठेंतरी मीं पाहिलं असावं असं वाटतं." प्लँशेकडे पाहून ऑथा म्हणाला.

" होय. मान्शर ऑथा, मी आपल्या पूर्ण ओळखीचा आहें." गहिंवरलेल्या कंठानें प्लँशे उद्गारला. ऑथाचें दातृत्व त्याच्या परिचयाचें असल्यानें त्याला पाहातांच तो गहिंवरून आला.


" कोण, प्लँशे? मग मान्शर डार्टाही आले आहेत कीं काय?" प्लँशेला ओळखून ऑथा म्हणाला.

" होय ऑथा!" हसत पुढें येऊन डार्टा म्हणाला.

डार्टाला पाहून ऑथाचा आनंद गगनांत मावेना. मोठ्या प्रेमानें त्याला हाताशीं धरून ऑथा दिवाणखान्याकडे गेला. इकडे ग्रीमाँ व प्लँशे ह्यांचें मेतकूट सुरू होतें. ऑथानें डार्टाचा पाहुणचार फारच थाटानें केला.

प्लुँशेचें जिव्हालौल्य लक्षांत घेऊन ऑथानें ग्रीमॉला त्याचा चांगला समाचार घेण्याबद्दल बजावून ठेविलें होतें.

रात्रीं विश्रांतीच्या वेळीं डार्टानें आपल्या आगमनाचा हेतु ऑथाच्या कानांवर घातला. पण ऑथानें पहिल्या झपाट्यालाच "पाजी, पैसेखाऊ इटालियन! राजाचं नांव पुढें करून प्रजेला लुटणारा हरामखोर!" इतक्या शेलक्या शब्दांत माझारीनची पूजा बांधल्यानें डार्टाला पुढें बोलायला जागाच राहिली नाहीं. "मला हें सगळं मान्य आहे, पण दुसरा चांगला माणूस आणायचा कुठला?" कांहीं तरी बोलायचें म्हणून डार्टा म्हणाला. पण एवढ्यानें ऑथा थोडाच बधणार! शेवटीं निराश होऊन डार्टा पारीसला परत फिरला. एका पार्थाखेरीज त्याची डाळ कोणाजवळच शिजली नाहीं.





प्रकरण तिसरें

# राजकीय कैदी

व्यूफोर आज कित्येक दिवस तुरुंगांत खितपत होता. राणी व माझारीन ह्यांच्या विरुद्ध उघडपणें उभें राहाण्याची पात्रता एकाच व्यक्तीच्या आंगांत होती आणि ती म्हणजे ब्यूफोर होय. राणी आणि माझारीन ह्यांचें कांहीं तरी सूत आहे असा उघड आरोपही करण्यास त्यानें कमी केलें नाहीं व त्यामुळें त्याला तुरुंगाची हवा खावी लागली. माझारीनचा विश्वासू अधिकारी ला रामी त्याच्या दिमतीला देण्यांत आला होता. ब्यूफोरला जनतेचा प्रचंड पाठिंबा असल्यानें, राजकीय कैदी ह्या दृष्टीनेंच त्याला वागविण्यांत येई. परंतु त्याला पळून जाण्याला वाव सापडूं नये म्हणून ला रामी मात्र डोळ्यांत तेल घालून जपत असे.

डार्टा पारीसला परत आल्यानंतर दोन चार दिवसांची गोष्ट. ला रामीला भेटण्यासाठीं एक मनुष्य आला. त्याला तुरुंगांत नोकरी पाहिजे होती. मनुष्य मोठा तऱ्हेवाईक होता. ला रामीला त्याची ती वागण्याची तऱ्हा मोठी अजब वाटली. होय किंवा नाहीं ह्या दोन शब्दांपलीकडे ह्या प्राण्याला दुसरें कांहीं येतच नसावें, असें त्याला वाटूं लागलें. त्यानें त्या

प्राण्याला ब्यूफोरच्या दिमतीला एकच दिवस दिलें मात्र, दुसऱ्या दिवशीं ब्यूफोर ला रामीला शिव्याशाप देऊं लागला. " हा मुका प्राणी माझ्या दिमतीला देऊन माझा छळ करण्याचा तुमचा विचार आहे काय ? " त्यानें ला रामीला विचारलें. ब्यूफोरची ही तक्रार आपल्या विरुद्ध आहे ह्याची दखलसुद्धा त्या इसमाला नव्हती. तो निर्विकार मुद्रा करून ला रामी व ब्यूफोर ह्यांचा संवाद ऐकत उभा होता.

" अहो, ह्यानें माझी केस विंचरण्याची फणीही काढून घेतली. " ब्यूफोर म्हणाला.

ला रामीनें आपल्या नव्या नोकराकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पाहिलें. त्यानें तत्काळ उत्तर दिलें, " तीक्ष्ण. "

' कैद्याजवळ तीक्ष्ण हत्यार ठेवूं देऊं नकोस ' ह्या आपल्या हुकुमाची ला रामीला आठवण झाली. फणीचे तीक्ष्ण दांतेही आपल्या ह्या हुकुमांत जमा करण्यांत आल्याचें पाहून त्याला ह्या नोकराचें मोठें कौतुक वाटलें, पण वरकरणीं तें न दाखवितां तो म्हणाला, " मूर्ख आहे झालं ! "

ला रामी बाहेर पडतांच ब्यूफोर ग्रीमाँच्या आंगावर धावून गेला. ब्यूफोरच्या पहाऱ्यावर आलेला हा नवा इसम ॲथाचा घुमा नोकर ग्रीमाँच होता. ग्रीमॉनें त्याचा प्रतिकार तर केला नाहींच, पण कोणाचें लक्ष नाहीं असें पाहून चटकन् एक चिठ्ठी ब्यूफोरच्या हातांत दिली. ब्यूफोर थंडच झाला. चिठ्ठींत मजकूर होता : " आपली मित्रमंडळी आपल्या सुटकेच्या नादांत आहेत. आलेला इसम विश्वासू असून आपल्याला सर्व प्रकारची मदत करील. "

दुसऱ्या दिवशीं ब्यूफोरनें ग्रीमाँविरुद्ध ला रामीकडे फिरून जोरदार तक्रार केली. ला रामीला त्यामुळें ग्रीमाँचा अधिकच विश्वास वाटूं लागला व त्यानें ब्यूफोरला दुसरा चांगला इसम मिळेपर्यंत ग्रीमॉलाच सांभाळून घेण्याची विनंती केली.

आज ब्यूफोरनें आपला वाढदिवस तुरुंगांतच साजरा करण्याचें ठरविलें. रात्रीं ला रामीला त्यानें आपल्या खोलींत जेवायला येण्याचें आमंत्रण दिलें. ग्रीमॉंनें तुरुंगाबाहेरच दुकान थाटून बसलेल्या मेवेवाल्याकडून उत्तम मद्य व पक्वान्नें आणण्याची योजना केली होती. ब्यूफोरच्या खाजगी खर्चांतून मेजवानीचा बेत झडणार असल्यानें ला रामी खूष होता. मेजवानीचा बेत संध्याकाळीं साताचा होता. पण ला रामी सहा पासूनच लुडबुड करूं लागला होता. ग्रीमॉंनें आपल्या खांद्यावरून आणलेली प्रचंड गुरोळी पाहातांच तर त्याच्या तोंडाला पाणीच सुटलें. ब्यूफोरच्या खोलींत एक मेज व दोन खुर्च्या मांडण्याची व्यवस्था त्यानें केली.

" ला रामी, तुमच्या माझ्यावरील लोभामुळेंच मला आज हा दिवस साजरा करतां आला ! " ब्यूफोर म्हणाला.

" कसचं कसचं ? " ला रामी म्हणतो, " आपली योग्यता काय आमच्या हाताखालीं कैद भोगण्याची आहे ? पण काळच विचित्र आला ! "

" म्हणजे माझी कैद आपल्यालाही पसंत नाहीं तर ? " त्याच्या हातीं मद्याचा चषक देऊन ब्यूफोर विचारतो.

" अलबत ! "

" माझी इथून सुटका झाली तर आपल्याला बरं वाटेल ? "

" निःसंशय ! "

मद्यानें व सुग्रास अन्नानें खूष झालेला ला रामी ब्यूफोरला खूष करण्यासाठीं म्हणाला.

इतक्यांत ग्रीमॉंनें वाढदिवसासाठीं आणलेली ती प्रचंड गुरोळी फोडून तीमधील खंजीर इतक्या शिताफीनें ला रामीच्या नरड्याला लावला कीं एक शब्द तोंडावाटे बाहेर काढणें म्हणजे प्राणाला मुकणें होय, हें त्याला कळून चुकलें. आपला हा मुका नोकर आपल्याच घाताला कारणीभूत झालेला पाहून ला रामी थक्क झाला. हां हां म्हणतां ब्यूफोर

व ग्रीमाँ ह्यांनीं ला रामीची गठडी वळली व गुरोळींतून आलेली दोरी घेऊन अंधारांतून लपत छपत तुरुंगाच्या तटाची वाट धरली. दोरीच्या साहाय्यानें त्यांनीं तटावरून उतरून आपली मुक्तता करून घेतली.



त्यांच्यासाठीं ठरल्याप्रमाणें तटाबाहेर घोडे घेऊन त्यांची मित्रमंडळी उभी होतीच. क्षणाचाही विलंब न लावतां सर्व मंडळी वायुवेगानें निघाली.

डार्टा व पार्था माझारीनच्या खोलींत बोलत उभे होते, इतक्यांत ब्यूफोरच्या पलायनाची वार्ता घेऊन एक मनुष्य धडपडतच आंत आला. वार्ता ऐकून माझारीनचें धाबें दणाणलें. तो केविलवाणी मुद्रा करून म्हणाला, "घात झाला! आतां हा फिरून कसा हातीं लागणार?"

"महाराजांनीं हुकूम करावा, मी त्याला खेचून घेऊन येईन." डार्टा म्हणाला. डार्टाच्या ह्या म्हणण्याला पार्थानें पण जोरानें पुष्टि दिली.

थोड्याच वेळांत डार्टा-पार्थोची दुक्कल सोसाट्यानें घोडे दौडीत पारीसमधून बाहेर पडली.

थोड्याच मजलींत त्यांच्या मांडीखालील जनावरें फेस गाळूं लागलीं, ठेचकाळूं लागलीं, पण डार्टानें त्यांची पर्वा केली नाहीं. कैद्याचा माग लागल्याकारणानें जनावरांना विश्रांति देण्याचेंही त्याच्या जिवावर आलें होतें, पण त्याच्या सुदैवानें एका झोपडीच्या दारांतच दोन उमदे घोडे बांधलेले त्याला दिसले. तत्काळ डार्टा-पार्थोनीं तीं दोन जनावरें ताब्यांत घेतलीं व मालकाच्या आरड्याकडे लक्ष न देतांच घोडे पिटाळले.

" कोण चाललें आहे ? " खड्या सुरांत विचारलेला हा प्रश्न त्यांच्या कानीं आला व अंधारांतून एक आकृति पुढें येऊन त्यांचा मार्ग रोखून उभी राहिली. " चल हट. हो बाजूला " डार्टा खेकसला. इतक्यांत दोन घोडेस्वारांनीं त्यांचा मार्ग पूर्ण रोखला. तरवारींचा खणखणाट चालू झाला. थोड्याच वेळांत डार्टा-पार्थोला कळून चुकलें कीं आपल्याबरोबर लढणारीं माणसें आपल्याइतकींच कसबी आहेत.

" ऑथा-अरामी आज दुर्दैवानें आपल्या बरोबर नाहींत. नाहींतर ह्या वेट्यांना दाखवला असता इंगा ! " निराश होत डार्टा चरफडला.

" कोण, मान्शर डार्टा ! " त्याचा शत्रु तरवार आखडती घेऊन म्हणाला.

" कोण पार्थो ! " पार्थोच्या शत्रूनेंही तेंच केलें.

व्यूफोरच्या वतीनें डार्टा-पार्थोचा मार्ग रोखून आज ऑथा व अरामी उभे होते. डार्टाची निराशा झाली. " मला कैदी न घेतांच परत जाणें भाग आहे काय ? " डार्टानें विचारलें.

" तसंच कांहीं नाहीं ! " आपल्या हातांतील तरवार फेकून देऊन ऑथा म्हणाला. " मला ठार मारून तुला कैदी नेतां येईल. हा मी तुझ्यापुढें उभा आहें ! "

अरामीनेंही काडकन् आपली तरवार मोडून फेकून दिली. "एका काळच्या जिवलग मित्राविरुद्ध मीं ही चालवली!" तो कष्टी आवाजानें म्हणाला.

डार्टनें ऑथाच्या गळ्याला मिठी मारली. "राजे नि प्रधान येतील नि जातील, पण त्यांच्यासाठीं आमच्या तरवारी मित्रांच्या रक्तानें रंगणार नाहींत!" तो म्हणाला.

"माझारीनच्या पक्षाचे काय किंवा प्रजापक्षाचे काय, आपण कुठल्याही पक्षाचे असलों तरी मित्रच राहूं!" ऑथा म्हणाला.

इतक्यांत खुद्द ब्यूफोरच पुढें येऊन म्हणतो, "मान्शर डार्टा, तुमच्या ह्या मित्रांनीं माझी अत्यंत खटपटीनें सुटका केली आहे. त्यांच्या श्रमांचं फळ अशा तऱ्हेनें तुम्ही घालवूं इच्छिणार नाहीं असं मला वाटतं."

थोड्याच वेळांत डार्टा व पार्था पारीसला परत फिरले. माझारीनला काय थाप मारावी ह्याचा त्याच्या चलाख डोक्यांत विचार चालला होता.





प्रकरण चौथें

# इंग्लंडची दुर्दैवी राणी

सीन नदीच्या कांठीं असलेल्या कॅथॉलिकांच्या भव्य मठांत, इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स् ह्याला यशप्राप्ति व्हावी म्हणून प्रार्थना चालली होती. इंग्लंडमध्यें राजा व प्रजा ह्यांच्यांत निकराचा संग्राम चालू होता व दोन्ही पक्षांचे हेर फ्रान्समध्यें वावरत होते. ह्या शेजारच्या राष्ट्राची आपल्याला सहानुभूति राहावी म्हणून दोन्ही पक्षांच्या खटपटी चालू होत्या. फ्रान्समधील कॅथॉलिकांची बरीचशी सहानुभूति राजाला होती व ह्याच मठाच्या आश्रयाला त्याची पत्नी हेन्रीटा व मुलगी येऊन राहिली होती. राणीचें सौंदर्य अनेक चिंतांनीं कोमेजून गेलें होतें. तिला दारिद्र्यांत दिवस काढावे लागत होते, पण तिची पतिनिष्ठा काडीमात्र कमी झाली नव्हती. राणी गुडघे टेकून आपल्या पतीला यश मिळावें म्हणून मनोभावानें प्रार्थना करण्यांत गढून गेली होती. तिची नऊ वर्षांची मुलगी तिच्या गळीं पडून म्हणत होती,

" आई आई, तूं इथल्या राणीकडे कां जात नाहींस ग ? ती तुझी वहीण आहे ना ? तिचा मुलगा इथला राजा आहे ना ग ? "

" बाळ, माझी बहीण आतां खरी राणी नाहीं. तिचा मुलगा लहान आहे आणि त्याच्या नांवावर भलतेच लोक राज्य करीत आहेत. तिथें

आपल्याला कोण विचारणार?" इतक्यांत एक इसम आंत आला व इंग्लंडहून कोणी एक गृहस्थ राजाचा निरोप घेऊन आला आहे म्हणून सांगूं लागला. मायलेकींना ही बातमी ऐकून आनंद झाला. राणीनें त्या गृहस्थाला आंत पाठवून देण्यास सांगितलें. चार्लसचा विश्वासू सरदार लॉर्ड विंटर आंत आला व त्यानें नम्रपणें राजाचा खलिता व एक थैली राणीच्या स्वाधीन केली. पत्रांत राजानें आपण आपल्या बंडखोर प्रजेचा बंदोबस्त करण्याच्या उद्योगांत असल्याचें कळविलें असून प्रत्यक्ष हकीकत विंटर तोंडी सांगेल असें लिहिलें होतें. "राजाकडे माणसें फारच थोडीं असून जयाची फारशी आशा दिसत नाहीं." हे विंटरचे शब्द ऐकून राणीला धक्का बसला. "पराभव झाल्यास महाराजांचा फ्रान्समध्यें येण्याचा विचार आहे," असें विंटरनें सांगतांच राणी म्हणाली, "त्यांना म्हणावं, एवढं मात्र करूं नका! माझी प्रत्यक्ष बहीण इथें राणी असून आम्ही थंडीवाऱ्यांत कुडकुडत आहोंत. उपवास काढत आहोंत. तिथें तुम्हांला कोण विचारणार?" राणीला पुढें बोलवेना. तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या.



" राणीसाहेबांनीं व्यर्थ चिंता करूं नये. तितका प्रसंग आलाच तर आम्ही महाराजांना घेऊन हॉलंडलाही जाऊं शकूं. पण तत्पूर्वी मला वाटतं आपण इथल्या राणीसाहेबांची एकदा गांठ घ्यावी, " विंटर म्हणाला.

थोड्याच वेळांत विंटर व राणी मठांतून बाहेर पडलीं.

* * *

इंग्लंडची राणी व विंटर फ्रान्सच्या राणीची भेट घेण्यासाठीं वाड्यांत येऊन पंधरावीस मिनिटें झालीं असतील नसतील, इतक्यांत माझारीनचा कारभारी बोर्नोई ह्याच्यापुढें एक तरुण मनुष्य येऊन उभा राहिला. " आपण कोणाकडून आलां आहां ? " बोर्नोईनें त्यास विचारलें.

" इंग्लंडचे सेनापति ऑलिव्हर क्रॉमवेल ह्यांच्याकडून मी माझारीन ह्यांना एक पत्र घेऊन आलों आहें. " तो तरुण उत्तरला.

" द्या आपला खलिता. मी पोचता करतों. "

" खुद्द माझारीनखेरीज तो मी इतर कुणाच्या हातीं देऊं शकत नाहीं. " तो तरुण निर्भीडपणें उत्तरला. बोर्नोईचा नाइलाज झाला. थोड्याच वेळांत क्रॉमवेलच्या त्या तरुण वकिलाला माझारीनपुढें नेऊन उभें करण्यांत आलें. माझारीन आपल्या भेदक नजरेनें क्रॉमवेलच्या दूताकडे पाहात म्हणतो, " आपण फारच तरुण दिसतां. "

" होय महाराज, माझं वय तेवीस–चोवीस वर्षांचंच आहे, पण आपल्या ह्या देशांतल्या कुणींतरी चार शिलेदारांनीं माझ्या आईचा खून केल्यामुळें माझं सर्व आयुष्य हालअपेष्टांत गेलं नि त्यामुळें मी तरुण असूनही म्हातारा दिसूं लागलों आहें. "

" अरेरे ! त्याबद्दल मला वाईट वाटतं. ते शिलेदार मला सापडले तर त्यांना मी जरूर शिक्षा करीन. तुमची हकीकत मोठी विलक्षण दिसते. "

" माझ्या आईविरुद्ध केलेल्या त्या कटांत माझा चुलताही सामील होता. माझी सर्व इस्टेटही त्यानेंच गिळंकृत केली आहे नि आतां तर तो इंग्लंडच्या राजाचा आवडता सरदार आहे. "

" अस्सं ! आणि म्हणून आपण क्रॉमवेलचा आश्रय केलात होय ? " माझारीन खोचून म्हणाला.

" होय महाराज, आपण म्हणतां तें कांहीं खोटं नाहीं. " क्रॉमवेलचा दूत निर्भीडपणें म्हणाला. माझारीननें क्रॉमवेलचा खलिता फोडून वाचला, त्यांत इंग्लंडच्या परिस्थितीचें सविस्तर वर्णन करण्यांत आलें असून लोकपक्षाच्या विजयाबद्दल निश्चिति प्रकट केलेली होती. त्याचप्रमाणें पराभूत इंग्लिश राजाला फ्रान्समध्यें आश्रय दिला गेल्यास फ्रान्सशीं नाइलाजानें युद्ध पुकारावें लागेल. ह्यासाठीं फ्रान्सनें आपली तटस्थता सोडूं नये असेंही सुचविलें होतें. खलिता वाचून झाल्यानंतर थोडा वेळ विचार करून माझारीन म्हणतो,

" मान्शर, माझ्या उत्तराची जर कुठें वाच्यता होणार नसेल तर ह्या पत्राचं उत्तर देण्याची माझी तयारी आहे. आपण बोलोन इथें दहा दिवस थांबा. तोंपर्यंत माझीं माणसं माझं उत्तर घेऊन आपल्याकडे येतील. "

" ठीक आहे. आपलं उत्तर बाहेर फुटणार नाहीं असं वचन मी आपल्याला माझ्या धन्याच्या वतीनें देऊं शकतों. " मोर्डा — क्रॉमवेलचा दूत — म्हणाला.

मोर्डा बाहेर पडून थोडा वेळ झाला नाहीं तोंच इंग्लंडची राणी हेन्रिएटा व राजाचा सरदार विंटर हीं माझारीनला भेटण्यास आलीं. ही दुक्कल कदाचित् बाहेर पडणाऱ्या मोर्डाच्या नजरेला आली असावी.

" मी माझ्या बहिणीपाशींच प्रथम गोष्ट काढणार होतें, पण म्हटलं फ्रान्सचीं सूत्रं आज आपल्या हातीं आहेत, तेव्हां प्रथम आपल्यालाच गळ घालावी म्हणून मी आज आपल्या भेटीस आलें आहें. " राणी माझारीनला म्हणाली.

" सरकारनीं आपल्या भेटीचा प्रथम मान मला देऊन मला ऋणी केलं आहे. " माझारीन विनयाचें दांडगें नाटक करून म्हणाला.

" मी आपल्याला एक विनंती करायला आलें आहें. इंग्लंडमधील प्रजा बंडाळी करून उठली आहे. महाराज तिचा बंदोबस्त करण्याच्या खटपटींत आहेतच, पण न जाणों, वेळ फिरलीच तर त्यांना फ्रान्समध्यें आश्रय मिळावा, म्हणून म्हणतें ... ... "

" सरकार, पण आज फ्रान्समध्यें तरी कुठें शांतता आहे ? " माझारीन मध्येंच म्हणतो. " शिवाय आमच्या राजांचंही पोरवय. अशा परिस्थितींत ही जबाबदारी .... "

" निदान इंग्लंडमध्यें कांहीं कुमक पाठवितां येणं शक्य असल्यास पाहावं. "

माझारीन पक्का होता. तो म्हणतो, " मला वाटतं कांहीं झालं तरी राजांनीं देशत्याग करूंच नये. परकीय राष्ट्रांतील सैन्य मदतीला घेणं म्हणजे आपलाच आपल्या प्रजेवर विश्वास नाहीं असं सांगण्यासारखं नाहीं का ? "

हा इटालियन बधण्याची कांहीं आशा नाहीं अशी खात्री होतांच राणी निराश मनानें विंटरला घेऊन बाहेर पडली. राजाच्या रक्षणाची शेवटची आशाही आतां नष्ट झाली.

" सरकारनीं धीर सोडूं नये. परमेश्वर अजूनही बरे दिवस दाखवील. " तिला धीर देण्याच्या उद्देशानें विंटर म्हणाला.

" आतां आशा करणं व्यर्थ आहे ! विंटर, आतां जगांत तुमच्या-खेरीज आम्हांला कोणी मित्र नाहीं ! "

लॉर्ड विंटर आठवल्यासारखें करून म्हणतो, " माझे चार फ्रेंच शिलेदार स्नेही आहेत. मागें त्यांनीं माझ्या भावजयीच्या बाबतींत व बकिंगहॅममहाराजांच्या बाबतींत अजब करामत करून दाखविली आहे. त्यांचं साहाय्य मिळालं तर किती तरी काम होईल. "

"मग पाहा त्या चौघांचं साहाय्य मिळतं का? प्रयत्नांत कसूर व्हायला नको."

राणीचा निरोप घेऊन विंटर आपल्या चार शिलेदारांना कसें गांठावें ह्याचा विचार करीत आपल्या मकानाकडे परतला. घरीं येईपर्यंत आपला पाठलाग होत आहे हें त्याच्या लक्षांतही आलें नाहीं. खोली उघडून तो आंत येतांच त्याच्या पाठोपाठ दुसरीही एक व्यक्ति आंत शिरली व विंटरपुढें उभी राहिली. तो क्रॉमवेलचा दूत मान्शार मोर्डा होता!



प्रकरण पांचवें

# एक जुनी हकीकत



" काकासाहेब, " मान्शार मोर्डा म्हणतो, " मला जुन्या गोष्टी नीटशा माहीत नाहींत, पण आज आपल्या तोंडून थोड्या फार कळल्या. आणखी कळाव्यात अशी इच्छा आहे. "

" अरे जा ! तुझ्या गोष्टींशीं माझा कांहीं संबंध नाहीं, मला उगीच सतावूं नकोस ! " विंटर त्याला झिडकारण्याच्या हेतूनें म्हणाला.

" माझा संबंध काय ? थेरड्या, तेंच सांगण्यासाठीं तर मी इथें आलों आहें. " दांतओठ खात मोर्डा म्हणाला. " राजाच्या कानीं लागून भावाची इस्टेट लाटणाऱ्या, भावजयीचा खून करून तिच्या मुलाला बेकार करणाऱ्या कपटी नीचा ! आज तुला जाब विचारायलाच मी आलों आहें. "

लॉर्ड विंटर धीराचा सरदार खरा, पण मोर्डाची ती भयंकर मुद्रा पाहून त्याचाही धीर खचला. स्वत:ला कसेंबसें सावरून तो म्हणतो, " ठीक आहे. तुला तुझ्या आईचं चरित्रच ऐकायचं आहे असं दिसतं. तिनें माझ्या भावाला — स्वत:च्या नवऱ्याला — विषप्रयोग केला होता. रिशल्यूच्या हेराचं काम करून तिनें बकिंगहॅमचा खून करविला. फ्रान्समध्यें अनेक लोकांना तिनें विषप्रयोग केला आणि ह्या सर्वाचं प्रायश्चित्त म्हणून तिला फ्रेंच शिलेदारांनीं चांडाळाकरवीं ठार केलं. ह्यांतला प्रत्येक शब्द खरा आहे ह्याबद्दल तुला पुरावा पाहिजे ? "

" कांहीं झालं तरी ती माझी आई होती ! माझ्या आईचा अमानुष रीतीनें वध करणाऱ्या प्रत्येकाचा मला सूड घ्यायचा आहे. आज तूं एक गुन्हेगार माझ्यापुढें उभा आहेस, बाकीच्या चौघांचा मला अद्याप ठावठिकाणा माहीत नाहीं म्हणूनच मी थांबलों आहें." अनावर झालेला आपला क्रोध दाबण्याचा प्रयत्न करीत मोर्डा म्हणाला. त्याच्या कपाळावरील एकूण एक शीर तट्ट फुगली होती. चेहरा लाल भडक झाला होता. डोळ्यांत खून चढला होता.



" लक्षांत ठेव. तुमच्या प्रत्येकाच्या छातींत खंजीर खुपसल्याखेरीज मी केव्हांच शांत होणार नाहीं." एवढी धमकावणी देऊन मोर्डा बाहेर पडला.

" एकंदरींत तो मला एकट्यालाच ओळखतो असं दिसतं " कपाळावरील घाम पुशीत विंटर पुटपुटला.

* * *

ब्यूफोरची सुटका केल्यानंतर ऑथा व अरामी ह्यांना डार्टा व पार्थांची कांहींच वार्ता कळली नाहीं. माझारीनला कांहीं तरी थाप मारून डार्टा वेळ मारून नेल्याशिवाय राहाणार नाहीं ही दोघांनाही खात्री होती पण एकदा त्यांची प्रत्यक्ष गांठ घ्यावी म्हणून दोघेही पारीसला आले. पारीसला येतांच इंग्लंडची राणी फ्रान्सच्या आश्रयाला आल्याची व तिच्या बरोबर विंटर नांवाचा सरदार आल्याची वार्ता त्यांना कळली. विंटरचें नांव ऐकतांच ह्या दोघांनाही मिलडीचा वृत्तान्त आठवला. तिच्या ह्या दिरामुळेंच मिलडीच्या कुटिल कारस्थानांतून त्यांची मुक्तता झाली असल्यानें ऑथा व अरामी ह्यांनीं प्रथम त्याची गांठ घेण्याचें ठरविलें. न जाणों, तो एखादे वेळीं फ्रान्स सोडूनही जायचा. विंटर ह्या शिलेदारांचा पत्ता कसा काढावा ह्या चिंतेंत असतां अकस्मात् ऑथा व अरामी त्याच्या पुढें येऊन उभे राहिले. विंटरचा आनंद गगनांत मावेना.

" सरकार! सरकार!! देव अद्याप आपल्याला विसरला नाहीं!" तो आनंदानें इंग्लंडच्या राणीला उद्देशून ओरडला.

सध्या राणी जेथें राहात होती ती बौद्धन चाल्दन मठांतील धर्मशाळा-वजा जागा होती. तिचें वैभव तें काय असणार? विंटरची हाक ऐकून राणी बाहेर आली. फ्रान्सच्या राजघराण्याशीं निकटचा संबंध असणाऱ्या इंग्लंडच्या राणीची ती दीन दशा पाहून ऑथा व अरामी ह्यांना भडभडून आलें. आपल्या दोघाही मित्रांना उद्देशून अरामी म्हणाला,

" माझारीन हा नीच इटालियन ऐश्वर्यांत लोळत आहे! आणि फ्रान्सच्या राजघराण्याचे नातलग दारिद्र्यांत पिचत आहेत!"

" बाबा, आज फ्रान्सला राजा कुठें आहे? माझारीनच फ्रान्सचा राजा होऊन बसला आहे." ऑथा उत्तरला.

राणीनें दारांत येऊन ह्या दोघा वीरांचें स्वागत केलें. विंटरनें सांगितलेल्या फ्रेंच शिलेदारांपैकींच हे दोघे असावेत एवढा अंदाज तिला आला होता. राणीचें दारिद्र्य व हीन दशा पाहून अरामीचें अंतःकरण

फिरून एकदा उचंबळून आलें. तो कावराबावरा होऊन इकडे तिकडे पाहूं लागला. त्याची चलबिचल पाहून राणी खिन्न होऊन म्हणाली, "माझं हें चमत्कारिक वैभव पाहून तुम्हांला काय वाटतं?"

"महाराज, माफी असावी, फ्रान्समध्यें आपला असा उपमर्द झालेला पाहून वाईट वाटतं आम्हांला!"

अरामीचे हे उद्गार ऐकून त्या संकटग्रस्त राणीला थोडें फार समाधान वाटलें. लॉर्ड विंटरनें दोघांच्या पराक्रमाचें व दानतीचें गौरवपूर्ण भाषेंत केलेलें वर्णन ऐकून राणी म्हणाली, "कांहीं दिवसांपूर्वी माझा शब्द झेलायला हजारों लोक तयार असत. आज ह्या दुर्दैवी स्त्रीपाशीं ह्या एका सरदाराशिवाय कोणीही नाहीं, मला आतां वैभवच नाहीं, मी आपल्यासारख्या शूरांचा गौरव कसा करूं?"

"सरकारस्वारीकडून आम्हांला कशाचीच अपेक्षा नाहीं; आमच्या हातून राणीसाहेबांचं कांहीं कार्य झालं तर आम्ही स्वतःला धन्य समजूं!" ऑथा म्हणाला. अरामीनेंही त्याचीच री ओढली.

"सगळ्या जगानें मला सोडलं. अशा वेळीं तुम्ही माझ्या साहाय्याला धावून आलां; मी तुमची दुर्दैवी बहीण आहें. महाराजांच्या खालोखाल मी तुम्हांला समजतें. त्यांच्याजवळ राहून त्यांचं संरक्षण करतां आलं तर पाहा!" डोळ्यांतील अश्रु टिपीत राणी म्हणाली.

"आम्ही आमचे प्राण खर्ची घालूं, पण आमच्यावर बहीण म्हणून विसंबलेल्या स्त्रीला विसरणार नाहीं. आम्ही हाडाचे शिलेदार आहोंत!" ऑथा म्हणाला.

त्यांनीं तत्काळ विंटरबरोबर इंग्लंडला जाण्याची तयारी केली. डार्टा व पार्थोला आपल्या कार्यक्रमाचीं पत्रें लिहिण्यास ते विसरले नाहींत.

** ** **

पारीस सोडल्यापासून तिसऱ्या दिवशीं सायंकाळच्या सुमारास विंटर, ऑथा व अरामी बोलोनला पोचले. पूर्वी राणीची रत्नमाला आणायला

ते ह्याच मार्गानें इंग्लंडकडे निघाले होते. त्यामुळें त्यांना वाटभर गप्पा मारायला विषय होता. आज ते इंग्लंडचा राजा चार्ल्स् ह्याला मदत करायला चालले होते. शहरांत येतांच ऑथा, अरामी व ऑथाचा नोकर ग्रीमॉं ह्यांना विंटरनें बंदराकडे राजरस्त्यानें रवाना केलें आणि आपला कोणास संशय येऊं नये व आपल्याला कोणीं ओळखूं नये म्हणून त्यानें जरा आडवळणाचा मार्ग पत्करला.

ऑथा व अरामी धक्क्यावर चकरा मारीत असतां, खिन्न चेहेऱ्याचा एक मनुष्य अस्वस्थ मनानें इकडे तिकडे वावरतांना त्यांना दिसला. धक्क्याला लागून खालीं एक होडी होती व तीमध्यें इंग्लिश खलाशी दिसत होते.

" हीच होडी बहुधा आपल्याला इंग्लिश गलबतावर नेणार असेल. पण अद्याप विंटर कसा आला नाहीं बुवा ? " अरामी ऑथाला म्हणाला.

" शूऽ चूप बैस ! कुणीतरी ऐकेल ना ! " ऑथानें त्याला दटावलें. पण ऑथाच्या त्या सूचनेचा आतां उपयोग नव्हता. फाटक्या आंगाच्या त्या मनुष्यानें अरामीचे शब्द ऐकले होते व ते ऐकून तो कावराबावराही झाला होता. पण शक्य तितकें स्वतःला सावरून तो अरामीला म्हणतो, " आपण पारीसहून आलां काय ? "

" होय ! " ऑथानें सभ्यपणानें उत्तर दिलें.

" अस्सं ! " म्हणून तो विक्षिप्त मनुष्य पुढें निघून गेला. इतक्यांत घाबऱ्या घाबऱ्या इकडे तिकडे पाहात विंटर आला. ऑथानें विंटरला घाबरण्याचें कारण विचारलें. पण तो विशेष बोलण्याच्या मनस्थितींत न दिसल्यानें ऑथानें चौकशी केली नाहीं. थोड्याच वेळांत अंधार झाला व ही मंडळी होडींत बसून गलबताकडे जायला निघाली. किनाऱ्यावरील खडकाचा एक प्रचंड कडा एके ठिकाणीं पाण्यावर पुढें झुकलेला असून त्याच्या जवळूनच होडीचा मार्ग होता. मघांचा तो संशयास्पद हालचाल

करणारा मनुष्य कड्यावर उभा राहून होडीकडे पाहात होता. मशालीच्या प्रकाशांत तो ऑथाला स्पष्टपणें दिसला.

" हेर ! " अरामीला डंवचून तो हळूच म्हणाला.

" कुठें आहे ? " ऑथाचें भाषण विंटरच्याही कानीं जाऊन त्यानें कड्याकडे पाहिलें.

" हाय रे देवा ! घात झाला ! ! तो इथेंही आहेच ! " विंटर घाबरून म्हणाला.

" कोण तो ? " अरामीनें विचारलें.

" मोर्डा ! मिलडीचा मुलगा ! ! क्रॉमवेलचा हस्तक ! ! ! "

" मिलडीचा मुलगा ! " ऑथा आश्चर्यानें ओरडला.

ऑथाचे शब्द खडकावरील त्या मनुष्याला स्पष्टपणें ऐकूं गेले. त्यानें एकदा निरखून होडीकडे पाहिलें. " होय, मीच आहें ! मीं ओळखलं आपल्याला, बरं ! " तो म्हणाला.

अरामीनें शांतपणें आपल्या सामानांतून आपली बंदूक बाहेर काढली व नेम धरला.

" झाडा गोळी ! " कधीं न बोलणारा ग्रीमाँ म्हणाला.

" चूप मूर्खा ! " अरामीचा हात पकडून ऑथा कांहीं बोलणार इतक्यांत कडाडधूऽम् असा बंदुकीचा बार झाला. ऑथाच्या धक्क्यानें अरामीचा नेम चुकला ; गोळी लागून कड्याचा एक खपला मात्र उडाला.

" सगळा घात केलास ! बरोबर त्याचें छाताड फोडणार होतों मी. " अरामी कुरकुरला.

" स्त्रीहत्या झाली तेवढी पुरे ! तिनें आपला अपराध केला होता, ह्या तिच्या पोरानें काय केलें आहे ? " ऑथा घोगऱ्या आवाजांत म्हणाला.

थोड्याच वेळांत सर्वजण गलबतावर आले व गलबत पाणी कापीत इंग्लंडच्या दिशेनें निघालें.



प्रकरण सहावें

# डार्टांची हिकमत

ब्यूफोरची सुटका झाल्यानें पारीसचें वातावरण बिघडलें. लोक उघड उघड बंडाची भाषा करूं लागले. गांवांत ठिकठिकाणीं लोकांनीं नाकेबंदी केली. राजदूतांना उजळ माथ्यानें वावरणें अशक्य होऊं लागलें. माझारीनचा जीव खालींवर होऊं लागला. ब्यूफोर हातीं न लागल्यानें तर तो फारच निराश झाला. वस्तुतः तो डार्टाला कमीअधिक बोलणार होता, परंतु पारीसचें वातावरण पाहून डार्टाला दुखविण्याची त्याची छाती झाली नाहीं. त्याशिवाय क्रॉमवेलच्या खलित्याचें उत्तर देऊन डार्टाला इंग्लंडला पाठविण्याचा त्याचा विचार असल्यानें ब्यूफोरच्या बाबतींत त्यानें मौनच पाळलें. इकडे ॲन राणीचीही अस्वस्थता वाढूं लागली होती. तिच्या मनांतून राजपुत्राला घेऊन सेंटजर्मेनला जाऊन तळ ठोकावा असें फार होतें. पारीसचें वातावरण तिलाही भीतिप्रद वाटूं लागलें होतें. ब्यूफोर राजपुत्राला ताब्यांत घेण्याचा प्रयत्न करण्यासही कचरणार नाहीं, हें ती ओळखून होती व तसा कांहीं प्रकार घडल्यास माझारीनचीं व आपलीं शंभर वर्षें भरलीं हेंही ती जाणून होती. पूर्वींच्या राजवटीपैकीं डार्टाच काय तो आतां तिच्या हातीं लागण्याजोगा होता व म्हणून तिनें डार्टाला


बोलावून घेऊन आपल्याला सुरक्षितपणें सेंटजर्मेनच्या किल्ल्यांत नेऊन पोचविण्याची गळ घातली. सेंटजर्मेनची शिबंदी भक्कम असून तेथलें लष्कर राणी व माझारीन ह्यांना अनुकूल असल्यानें राणीनें हा मार्ग पत्करला होता. राणी, माझारीन व राजपुत्र ह्यांना सुरक्षितपणें पारीसमधून बाहेर काढून सेंटजर्मेनला पोचविण्याची कामगिरी डार्टा-पार्थोनीं शिरावर घेतली.

डार्टा जबाबदारी पत्करून बसला खरा पण आज पारीसचें स्वरूप त्याला कांहीं विलक्षणच दिसलें. शहराच्या प्रत्येक सडकेवर लोकांनीं कडेकोट बंदोबस्त केला होता. एकही वाहन पुरी विचारपूस केल्याशिवाय सोडण्यांत येत नव्हतें. राजसत्तेचें समूळ उच्चाटन पारीसमधून तर झालें होतेंच पण विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं माझारीन शहर सोडून पळून जाणार असल्याची भूमकाही गांवांत उठली होती व लोक विशेष जागरूक होते. आपल्याला कोणत्या मार्गानें बाहेर पडतां येईल हें पाहाण्यासाठीं डार्टानें सबंध शहराला फेरी घातली. लोकांनीं अनेक वेळां त्याला हटकलें, पण माझारीनला शिव्या देण्यांत लोकांच्याही पुढें मजल मारून डार्टानें आपली सुटका करून घेतली. एके ठिकाणीं एक बंदिस्त गाडी उभी असलेली त्याला दिसली. गाडीवर लोकपक्षाचीं चिन्हें काढलेलीं असून लोकपक्षाचा कोणीतरी पुढारी तीमधून प्रवास करणार असावा असें स्पष्ट दिसत होतें. गाडीवान आपल्या जागीं बसून पेंगत होता.

डार्टाच्या चलाख डोक्यांत एक कल्पना आली. तो हळूच गाडींत बसला व त्यानें हल्केच गाडीवानाच्या हाताला स्पर्श करून गाडी हाकलण्याचा इशारा दिला. "राजवाड्याकडे" तो पुटपुटला. गाडीवान खडबडून जागा झाला व आपल्या धन्याचाच इशारा आहे असें समजून त्यानें राजवाड्याच्या दिशेनें गाडी भरधाव सोडली. वाड्याच्या पहारेवाल्याकडून गाडी अडवली जायची पण पडदा बाजूला सारून डार्टानें डोकें बाहेर काढल्यामुळें कोणींही अडथळा केला नाहीं व गाडी सरळ मधल्या

चौकांत येऊन उभी राहिली. गाडीवान खालीं उतरला व त्यानें दरवाजा उघडला. डार्टानें गाडींतून बाहेर उडी टाकतांच तो चाटच पडला! डार्टानें त्याची मानगूट पकडून त्याला पहारेवाल्यांच्या ताब्यांत दिलें व सांगितलें, "ह्याला डांबून ठेवा व ह्याचे कपडे काढून घ्या. जरा गडबड केलीन् अगर आरडा केलान् तर त्याचे तुकडे करून टाका. जर ह्यांत कसूर झाली तर तुम्हांला गोळ्या घालीन!" डार्टाचे ते भयानक शब्द ऐकतांच गाडीवानाची बोबडीच वळली. त्यानें आपल्या हातांनीं कपडे काढून दिले.

मध्यरात्रीच्या सुमारास डार्टानें राणी, राजपुत्र व माझारीन ह्यांना गाडींत आणून बसविलें व आपण गाडीवानाचा पोशाख घालून गाडी हाकण्यास आरंभ केला. पार्थाही आंत गाडींतच बसला. गाडी वेशीपाशीं येतांच चौकीदारानें पुकारलें पण गाडीवरील लोकपक्षाचीं चिन्हें व गाडीवानाचा लोकपक्षाचा पोषाख पाहून त्यानें विशेष पंचाईत केली नाहीं. हां हां म्हणतां गाडी पारीस सोडून सेंटजर्मेनच्या मार्गाला लागली. सेंटजर्मेनला पोचल्यानंतर राणी डार्टाला म्हणाली, "मान्शार डार्टा,



तुमच्या आजच्या कामगिरीबद्दल तुम्हांला भारंभार सोनं दिलं पाहिजे." माझारीननेंही डार्टाची तोंडभर स्तुति केली व हळूच क्रॉमवेलला द्यायचा लखोटा त्याच्या स्वाधीन केला. "मान्शर डार्टा, तुम्ही व पार्था बोलोनला जाऊन मान्शर मोर्डाची गांठ घ्या व त्याच्याबरोबर इंग्लंडला जाऊन हा लखोटा क्रॉमवेलच्या स्वाधीन करा. तेथून आल्यानंतर तुमच्या सर्व कामगिरीचं चीज करण्याचा माझा निश्चय झाला आहे." माझारीन म्हणाला.

ऑथा-अरामी इंग्लंडला गेले असल्याची वार्ता डार्टाला कळली असल्यानें डार्टाला मनांतून आनंदच झाला पण तो वर न दाखवितां त्यानें अशी कष्टी मुद्रा केली कीं माझारीनला त्याला खूष करण्यासाठीं वाटखर्चाला म्हणून बरीच मोठी रक्कम द्यावी लागली.





प्रकरण सातवें

# इंग्लंडचा दुर्दैवी राजा

इंग्लंडला जाण्यापूर्वी एकदा पारीसला जाऊन यावें म्हणून डार्टा-पार्था परत पारीसला आले. दरबारी मंडळी नाहींशी झाल्यामुळें लोकांना चांगलेंच फावलें होतें. खुद्द राजवाड्याच्या आंगणांत लोकसैनिकांची कवाईत चालू होती व प्लँशे तीवर देखरेख करीत होता. प्लँशेची ही करामत पाहून डार्टा खूष झाला. आपला नोकर चार पावलें आपल्याही पुढें गेलेला पाहून डार्टासारख्या उमद्या धन्याला कां आनंद होणार नाहीं? तो आपल्या बिऱ्हाडीं आला, तेव्हां मॉडेलीबाईनें त्याच्या हातीं एक पत्र आणून दिलें. पत्र अरामीचें होतें. त्यांत त्यानें निर्वाणीनें लिहिलें होतें, "मी व ऑथा इंग्लंडच्या राणीनें आम्हांला बहीण म्हणून गळ घातल्यानें राजाच्या रक्षणार्थ येथें आलों आहोंत. आमचें कांहीं बरें वाईट झाल्यास आमच्या सर्व मालमत्तेची वासलात तूंच लाव. बोलोनला मोर्डा नांवाचा क्रॉमवेलचा हेर — मिलडीचा मुलगा — आहे. बाळ आईइतकेंच विषारी आहे. तो जिवंत राहिल्यास इंग्लंडमध्यें आम्हांला निश्चित धोका आहे. शक्य तों लौकर त्याला ठार करणें."

" अरे, आपण ज्याला भेटायला जाणार आहोंत तोच तर हा मोर्डा नाहीं ना ? " पत्रांतील मजकूर ऐकून पार्था म्हणाला.

" खास तोच ! " डार्टी उत्तरला.

" मग मित्रकार्य आधीं ! बोलोनला जातांच त्याला मुरगळून टाकूं ! " पार्था म्हणाला. पण डार्टीला पार्थाचा विचार पसंत पडला नाहीं. मोर्डाला घेऊन इंग्लंडला जावें आणि ऑथा व अरामी ह्यांची भेट घेऊन काय तें करावें असें त्याचें म्हणणें पडलें. पार्थानेंही मग विशेष तक्रार केली नाहीं.

एके दिवशीं संध्याकाळच्या सुमारास डार्टी-पार्था ह्या दुकलीनें बोलोन शहरांत प्रवेश केला. मोर्डाचा कोठें तपास करावा ह्याचा विचार करीत ते एके ठिकाणीं उभे असतां काळ्या पोषाखांतील एक तरुण आपणाकडे टक लावून पाहात आहे असें त्यांना आढळून आलें. डार्टी त्या तरुणाला उद्देशून म्हणतो, " माझ्याकडे असं टक लावून पाहिलेलं मला खपत नाहीं. "

" आपण पारीसहून आलांत काय ? " त्या तरुणानें निराळाच प्रश्न विचारला.

" होय. "

" मग क्षमा करा हं , पारीसहून मजकडें कोणी विशेष प्रवासी येणार असल्यानें मला पारीसहून येणाऱ्या प्रवाशाकडे पाहाण्याचा मोह आवरत नाहीं. "

" आपणाकडे येणारे प्रवासी कशासाठीं येणार आहेत ? "

" मजबरोबर ते इंग्लंडला येणार आहेत. "

" आपण मान्शर मोर्डा काय ? "

" आपण माझारीनकडून आलां काय ? "

" होय ! "

" मीच मान्शर मोर्डी ! "

" प्रवासाची तयारी आहे. "

" आज दोन दिवस मी वाट पाहात आहें. "

" मग चला. "

थोड्याच वेळांत डार्टा-पार्थाची जोडी घेऊन एक जहाज इंग्लंडच्या दिशेनें प्रवास करूं लागलें. ऑथा-अरामी राजपक्षाबरोबर गेले तर डार्टा-पार्था लोकपक्षाच्या साहाय्यानें प्रवास करूं लागले. ते फ्रान्समध्यें असतांना बरोबर ह्याच्या उलट परिस्थिति होती.

प्रजेशीं झुंजून कंटाळलेल्या इंग्लिश राजाचा तळ इंग्लंड व स्कॉटलंड ह्यांच्या सरहद्दीजवळील दोन नद्यांमध्यें पडलेला होता. हें ठिकाण न्यूकासल-पासून जवळच होतें. रात्रीचा एक वाजला होता. पहारेवाल्यांच्या हालचालीखेरीज छावणींत सर्वत्र शांतताच होती. राजा तळमळत बिछान्यावर पडला होता. शेजारच्या तंबूंत विंटर विचार करीत बसला होता. जवळच ऑथा वं अरामी आपापल्या बिछान्यावर पडून होते.

इतक्यांत तंबूचा पडदा बाजूला सारून एक दूत आंत आला.

" महाराज, क्रॉमवेल आज वस्तीला न्यूकासलला येऊन थडकला आहे. " तो घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला. ऑथा व अरामी ताडकन् उठून उभे राहिले.

" महाराजांचे सैनिक फितूर करण्याच्या मोहिमेवर तो आला आहे. सर्व स्कॉच लोकांना पैसे देऊन त्यानें त्यांच्याकडून सरकारना मदत न करण्याबद्दल वचन घेतलं आहे. स्कॉच सरदारांचा आतां आपल्याला कांहीं उपयोग होणार नाहीं. "

विंटर, ऑथा व अरामी धावतच राजाच्या तंबूकडे आले. ह्या अनपेक्षित बातमीनें राजा चांगलाच गोंधळून गेला.

" कांहीं झालं तरी मला वाटतं उजाडण्याच्या आंत आपण स्कॉटलंडच्या मार्गाला लागावं. तेथील सरदार लॉर्ड मांटमोर आपला विश्वासघात खास करणार नाहीं. " विंटर म्हणाला.

" नको ! मला ह्या धडपडीचा आतां कंटाळा आला आहे. " चार्लस् निराश होऊन म्हणाला.

" ह्या स्कॉच लोकांना माझा विश्वासघात करून मला शत्रूच्या स्वाधीन करायचं असेल तर त्यांना तसं खुशाल करूं दे ! "

" सरकार, आपल्यामागें कुटुंबाच्या प्रेमाचा पाश आहे. आम्ही ही गोष्ट अशी सहजासहजीं होऊं देणार नाहीं. " ॲथा म्हणाला.

" तुम्ही परकीं माणसं माझं इतक्या प्रेमानें रक्षण करूं इच्छितां आणि माझे लोक मात्र माझ्या जिवावर उठले आहेत. " राजा म्हणाला.

" सरकार, मी, माझा मित्र हा अरामी व विंटर असे तिघे आपल्याला ह्या प्रसंगांतून निभावून नेऊं शकूं. आपण एकदा स्कॉटलंड गांठलं कीं पुष्कळच काम होईल. बाकी कोणी येवोत अगर न येवोत ! " ॲथा म्हणाला.

सर्वांनाच हा बेत पसंत पडून विंटर घोडे तयार करण्यासाठीं निघून गेला. थोड्याच वेळांत हीं चार माणसें नदी ओलांडून स्कॉटलंडमध्यें जाण्याला सज्ज झालीं. पहाटेची वेळ होती. झुंजूमुंजू दिसूं लागलें होतें. इतक्यांत ॲथाची नजर नदीच्या पलीकडे दिसणाऱ्या एका काळ्या रांगेकडे गेली. पहाटेच्या अंधुक प्रकाशांत अस्पष्ट दिसणारी ती रांग पाहून ॲथा दचकला. तिकडे बोट दाखवून तो म्हणाला, " महाराज, ही काळी रांग कसली दिसते आहे ? "

" नदीकांठीं नेहमींच असं धुकं दिसतं. " राजा म्हणाला.

" पण काल तें दिसत नव्हतं. " ॲथा उत्तरला. " सरकार, घात झाला ! हें धुकं नाहीं. शत्रूनें आपल्याला घेरलं आहे. "

" ठीक आहे. होऊन जाऊं दे एकदा सोक्षमोक्ष ! " राजा बेपर्वाईनें उद्गारला व त्यानें आपला घोडा लेव्हीन ह्या स्कॉच सरदाराच्या तंबूकडे फेकला. तंबूची कनात दूर करून राजा सरळ तंबूत शिरला. लेव्हीनबरोबर आणखीही कांहीं स्कॉच सरदार तेथें बोलत बसले होते. राजाला पाहातांच ते सर्वजण चपापून उठून उभे राहिले.

" मी तुम्हांला जाब विचारण्यास आलों आहें ! " राजा त्यांना म्हणाला.

" काय झालं सरकार ? " लेव्हीन म्हणाला.

" काय झालं म्हणून आणि मलाच विचारतां ? " राजा संतापानें ओरडला.

" क्रॉमवेल न्यूकासलला आला, त्यानें माझा स्कॉटलंडचा मार्ग रोखून धरला आणि इतकं सर्व होईपर्यंत तुम्ही स्वस्थ बसलां, नाहीं, त्याला फितूर झालां ? क्रॉमवेलशीं करार करून तुम्हीं माझा सौदा केलात ! "

" सरकारना कोणीं तरी खोटी बातमी दिली आहे ! " लेव्हीन चाचरत म्हणाला.

" स्कॉटलंडच्या वाटेवर शत्रु आडवा उभा आहे. मी स्वत: डोळ्यांनीं पाहून आलों आहें. शत्रूची फळी फोडून मला वाट करून द्या, म्हणजे झालं. तुमच्या इमानीपणाची शाब्दिक हमी मला काय करायची आहे ? "

इतक्यांत दोन स्कॉच सरदार पुढें येऊन म्हणाले, " जुलमी राजापासून देशाचं रक्षण करणं हेंच खरं इमान ! देशाच्या हितासाठीं तुला पकडून द्यायला आम्ही बांधले गेलों आहोंत. चार्लस् स्टुअर्ट, तूं आमचा कैदी आहेस ! " दोघांनींही राजाला पकडण्यासाठीं आपले हात पुढें केले, पण राजापर्यंत ते पोचूं शकले नाहींत. ॲथा–अरामीच्या तलवारींच्या सफाईदार फटक्यांनीं दोनही सरदार त्याच क्षणीं जमीनदोस्त झाले.

" विश्वासघात ! ज्या देशांत मी जन्मलों त्याच देशाच्या लोकांनीं माझा घात केला. " कपाळावर हात मारून राजा म्हणाला.

"सरकार, उठा. शोक करण्याची ही वेळ नव्हे. काय वाटेल तें करून आपल्याला इथून निसटलं पाहिजे." ऑथा म्हणाला.

राजाच्या छावणींत सर्वत्र औदासीन्य पसरलें होतें. राजाच्या वतीनें हालचाल करायला कोणीच फारसें तयार नव्हतें. आतां चांगलें उजाडलें होतें. त्या चिमुकल्या छावणीला सर्व बाजूंनीं क्रॉमवेलच्या सैनिकांचा वेढा पडला होता. कांहीं थोडे लोक राजाच्या वतीनें शत्रूची फळी फोडून पार व्हायला सज्ज झाले. इतक्यांत वावटळीसारखी शत्रुपक्षाची एक तुकडी त्यांच्यावर येऊन आदळली. त्या तुकडीचा म्होरक्या विंटरनें तत्काळ ओळखला.

"तोच तो!" घाबऱ्या घाबऱ्या विंटर म्हणाला.

राजाच्या लोकांनीं शस्त्र खालीं ठेवलें. कोणीच लढण्यास तयार नव्हतें. ऑथा, अरामी व विंटर ह्यांच्याच तलवारी काय त्या चालू होत्या. आपला



घोडा विंटरच्या आंगावर घालून टोळीचा म्होरक्या त्याला म्हणाला, "काकासाहेब, कां उगीच धडपडतां? तुमचा क्षण भरला आतां!"

ठोऽ! मोर्डाच्या पिस्तुलाची गोळी कपाळांत लागून तो वृद्ध सरदार

धाडकन् खालीं पडला. अगदीं ह्याच क्षणाला ऑथा व अरामी ह्या दोघांना दोन धटिंगणांनीं नि:शस्त्र करून कैद केलें.

" कोण, मान्शर डार्टा ! " ऑथा ओरडला.

" चूप ! बोलूं नकोस. घात होईल ! " डार्टा पुटपुटला व त्यानें अरामीलाही न बोलण्याबद्दल खूण केली. पार्थानें अरामीला कैद केलें होतें. ह्या दोघांना घेऊन मोर्डा आपल्या लोकांनिशीं क्रॉमवेलकडे येत असतां अकस्मात् त्याला ही संधि मिळाली. विंटरला ठार करून त्यानें आपला सूड उगवून घेतला. राजाला कैद केलें. विंटरचे दोन फ्रेंच दोस्तही त्याच्या हातीं लागले, पण डार्टा-पार्थानीं त्यांचा कबजा घेतला होता.

डार्टा आपल्या हातीं लागलेल्या कैद्याबद्दल मोर्डाजवळ ऐसपैस गप्पा मारीत होता. मोर्डाला त्यामुळें कांहींच शंका आली नाहीं. राजा विंटरच्या प्रेताकडे पाहून अश्रु ढाळीत होता. त्याला उद्देशून मोर्डा म्हणाला, " महाराज, माझ्या गोळीनें त्याचं पुरतं काम केलं आहे. तो आतां जिवंत होणार नाहीं. सेनापति क्रॉमवेल आपलं स्वागत करण्यास सज्ज आहे. तिकडे आतां आपण चलावं. "

मोर्डाचें हें क्रूर भाषण ऐकून अरामी हळूच म्हणाला, " मिलडीचं विष ह्या बाळाच्या अंगांत मुरून जास्तच जहरी झालं आहे. त्याचा निकाल तेव्हांच लावायला हवा होता. "

ऑथानें नुसताच एक दीर्घ उसासा टाकला.



प्रकरण आठवें

# मोर्डाच्या हातावर तुरी

चार्लस् हातीं लागतांच प्रजापक्षाच्या विजयाची वातमी सर्वत्र कळविण्यासाठीं क्रॉमवेलनें दूत रवाना केले. इंग्लिश सैन्याचा मुक्काम न्यूकासललाच पडला.

एके दिवशीं मोर्डानें डार्टाला गांठलें व म्हटलें, "अजून तुम्ही सेनापतींना भेटलां नाहीं? चकमक संपतांच त्यांनीं तुम्हांला बोलावलं होतं."

"आम्ही आमच्या कैद्यांसाठीं सुरक्षित जागा बघण्याच्या धांदलींत आहों. अहो, प्रत्येकापासून कमींत कमी दोन दोन हजार पिस्टोल मिळण्यासारखे आहेत. कैद्यांची व्यवस्था एकदा लागली म्हणजे मग सेनापतींची गांठ घेऊं नि निरोप मागूं!" डार्टा म्हणाला.

"म्हणजे तुम्ही इतक्यांत जाणार कीं काय?" मोर्डानें विचारलें.

"आमची कामगिरी संपली, क्रॉमवेलची अनुमति मिळतांच आम्ही परत आमच्या देशाला जाणार!" डार्टाच्या ह्या बोलण्यानें मोर्डा जरा अस्वस्थ झालेला दिसला. आपला एक मनुष्य डार्टाच्या पाळतीवर ठेवून तो तेथून झटकला व क्रॉमवेलकडे आला.

" कोण, मोर्डा ! काय काम आहे ?" क्रॉमवेलनें त्याला पाहून विचारलें.

" मी आपलं अभिनंदन करण्यासाठीं आलों आहें. चार्लस् हातीं आला. आज आपण इंग्लंडचे धनी झालां !" मोर्डा म्हणाला.

" मोर्डा, तूं ही फार चांगली कामगिरी बजावलीस."

" ती पसंत पडली ना आपल्याला ?"

" अलबत् !"

" मग माझं एक मागणं आहे !"

" काय ?"

" आज दोन फ्रेंच कैदी आपल्या हातीं लागले आहेत ते मला पाहिजे आहेत."

" तुझे कोणी मित्र आहेत काय ते ?"

" होय महाराज !"

" सध्या ते कुठें आहेत ?"

" माझारीनकडून आलेल्या फ्रेंच दूतांच्या ताब्यांत आहेत, त्यांनींच त्यांना कैद केलं आहे नि त्यांच्याकडून कांहीं पैसे काढण्याचा त्यांचा विचार आहे."

" जा ! ते कैदी मीं तुला वहाल केले आहेत. त्यांचं तूं वाटेल तें कर, जा !" क्रॉमवेल म्हणाला. मोर्डाचा आनंद गगनांत मावेना. तो धावतच डार्टाकडे यायला निघाला.

ऑथा, पार्थो, अरामी व डार्टा आतां ह्या प्रसंगांतून कसें निभावून जावें ह्याचा विचार करीत बसले होते. ऑथा व अरामी ह्यांना वरकरणी ते आपले कैदी असल्याप्रमाणें वागवीत व त्यांच्यावर पहारा वगैरे ठेवून असत. मोर्डाचाही ह्या कैद्यांवर डोळा असल्यानें त्यानें आपलेही कांहीं पहारेकरी त्यांच्यावर टेविले होते.

" तुझ्या सूचनेप्रमाणें मीं बोलोनलाच ह्या बाळाचं नरडं घोटलं असतं तर फार बरं झालं असतं." पार्थो अरामीला म्हणाला. इतक्यांत खिडकींतून बाहेर पाहात उभ्या असलेल्या ऑथानें मोर्डा येत असल्याची वर्दी दिली. पार्थोला नीट पहारा करण्यास सांगून डार्टा मोर्डाला गांठण्यासाठीं बाहेर आला. मोर्डाचे दोन पहारेकरी बाहेर विसांवा घेत पडले होते.

मोर्डा येतांच डार्टानें त्याला " काय पाहिजे ? " म्हणून विचारलें.

" आज सकाळच्या चकमकींत तुम्हीं जे दोन कैदी पकडले आहेत ते मी माझ्या बिऱ्हाडीं घेऊन जाणार आहें." मोर्डा म्हणाला.

" ह्यः ह्यः ह्यः " डार्टा हसून म्हणतो, " भले महाराज ! त्यांना कैद केलं आम्हीं आणि आमची ही शिकार तुम्ही आयती लाटणार. खासा न्याय ! विंटर चांगला हातीं लागला होता त्याचा जीव घेऊन बसलांत ! दहा पांच हजार पौंड लागले नसते हातीं ? "

" तें कांहीं असलं तरी मला हे कैदी पाहिजेत ! " मोर्डा आंत जाण्याच्या तयारीनें म्हणाला.

" हें पाहा मान्शर, अशी दंगामस्ती करून कांहीं चालणार नाहीं. हे कैदी असे मी सहजासहजीं सोडणार नाहीं. म्हटलं, पैशाचा प्रश्न आहे हा ! " डार्टा शक्य तितकें स्मित तोंडावर आणून म्हणाला.

" खुद्द सेनापति क्रॉमवेल ह्यांनीं मला कैदी ताब्यांत घेण्याचा हुकूम दिला आहे. " मोर्डा डार्टाला धमकावण्यासाठीं म्हणाला.

" फार छान ! कुठें आहे ? पाहूं बरं हुकूम. मला काय, तुमच्या सेनापतिसाहेबांकडून काढूं बक्षिशी ! "

मोर्डापाशीं लेखी हुकूम कोठें होता ? तो म्हणाला, " एवढंच ना ! लेखी हुकूम नि एक हजार पिस्टोल अर्ध्या घंट्यांत तुमच्याकडे रवाना करतों. मग तर झालं ? द्या तर कैदी माझ्या ताब्यांत. " मोर्डा म्हणाला. निव्वळ पैशासाठीं डार्टा हुजत घालीत असावा हीच त्याची कल्पना.

" छे छे ! मी शिस्तीचा भोक्ता आहें. आधीं हुकूम, मग, अंमल !" डार्टा म्हणाला.

" इथें माझी सत्ता चालते. माझ्यासाठीं तुम्हांला आपली शिस्त बदलणं भाग आहे." मोर्डा खवळून म्हणाला.

" तें मला समजलं." डार्टा हसून म्हणाला, " तुम्हीं अजून मला ओळखलं नाहीं. पार्था !"

" काय मान्शर डार्टा !" पार्था दारांत येऊन म्हणाला.

" मान्शर मोर्डा म्हणतात, तुमची शिस्त बाजूला सारून कैदी घेऊन जाईन !"

" तत्पूर्वी अशा शंभर मोर्डांना स्वर्गाला जावं लागेल." पार्था मोर्डाकडे न पाहातांच म्हणाला.

" आम्ही इथें माझारीनचे दूत म्हणून आलों आहोंत, नाहीं ?" डार्टा विचारतो.

" आम्हां फ्रेंच सरकारच्या दूतांना धमकी देणारांना मला जाब विचारायचा आहे." पार्थाचा भव्य देह मोर्डाच्या दिशेनें चालूं लागतांच डार्टानें त्याला आवरलें. मोर्डा उमगला कीं लेखी हुकुमाशिवाय कैदी मिळणें शक्य नाहीं. क्रॉमवेलचा हुकूम व डार्टाच्या तोंडावर फेकण्यासाठीं पैसे आणण्यासाठीं म्हणून मोर्डा गेला. थोड्याच वेळांत तो परत आला. पण पाहातो तों काय ? त्याचे पहारेवाले धूळ खात पडले होते व कैदी केव्हांच पसार झाले होते. संतापानें एक किंचाळी फोडून तो बेशुद्ध झाला !

मोर्डाच्या तावडींतून सुटल्यानंतर चौघाही मित्रांनीं सरळ जंगलाचा रस्ता सुधारला. पाठलाग होण्याची भीति कमी झाल्यानंतर एके ठिकाणीं विश्रांतीसाठीं त्यांनीं आपले घोडे उभे केले. " मला वाटतं आतां तडक जवळचं एखादं बंदर गांठावं नि एखादं जहाज भाड्यानें घेऊन फ्रान्सचा

रस्ता सुधारावा." डार्टी म्हणाला. तत्काळ पार्थनिंही त्याच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

"तुम्ही आपले वाटेला लागा. पण आम्ही मात्र येऊं शकत नाहीं." ऑथा म्हणाला. डार्टीला ऑथाच्या म्हणण्याचा कांहींच अर्थ कळेना.

"राजाला वांचविण्याची शक्य ती खटपट करणं आमचं कर्तव्य आहे. आम्ही मुख्यतः त्याच कामगिरीवर आलों आहों." ऑथानें खुलासा केला.

"राजाला घेऊन क्रॉमवेल लंडनकडे गेला आहे आणि तिथें त्याची चौकशी करून त्याचा वध करण्याचा त्याचा निश्चय आहे." डार्टी म्हणाला.

"मग तर मला इंग्लंड मुळींच सोडतां येणार नाहीं." ऑथा निश्चयानें म्हणाला. "माझ्या जिवाचं मोल देऊनही मी राजाला वांचविण्याचा प्रयत्न करणार आहें."

"बोलून चालून हा परका देश, इथली भाषा आपल्याला अवगत नाहीं, देशाची काडीमात्र माहिती नाहीं, तुझा हा निव्वळ वेडेपणा आहे, ऑथा!" डार्टी समजावणीच्या स्वरांत म्हणाला.

"मला अवश्य तेवढी इंग्लंडची व इंग्लिश भाषेची माहिती आहे." ऑथाचा निश्चय बदलण्याचें चिन्ह दिसेना.

"ठीक आहे! तुझा हट्टच आहे तर सारेच जण ह्या भिकारड्या देशांत मरून जाऊं. मरायचंच म्हटल्यानंतर इथें काय आणि कुठें काय?" डार्टी त्राग्यानें म्हणाला.

सर्वांनीं रात्रीचा प्रवास करीत लंडन गांठलें. विंटरच्या माहितीनें ऑथाची एका राजपक्षीय खाणावळवाल्याची ओळख झाली होती, तेथेंच सर्वांनीं मुक्काम केला. इंग्लिश पद्धतीचे पोषाख सर्वांनीं परिधान केले. प्रतिष्ठित इंग्लिश नागरिक बनून ते लंडनमध्यें वावरूं लागले.

आज राजाला लंडनमध्यें आणण्यांत येणार होतें. दिवस उगवल्यापासून सर्व शहर माणसांनीं नुसतें फुलून गेलें होतें. ह्याच गर्दींत हे चौघेही मित्र मिसळले होते. थोड्याच वेळांत राजाची गाडी आली. राजाच्या एका बाजूला मोर्डी व दुसऱ्या बाजूला हॅरिसन हे पहारा करीत होते. राजाची लोकसभेपुढें चौकशी होणार असल्याची दवंडीही ह्याच वेळीं पिटण्यांत आली.

लोकसभेपुढें राजाची चौकशी सुरू झाली, त्या वेळींही लोकांनीं अशीच गर्दी करून सोडली. न्यायाधीशांनीं राजावरील आरोपांची यादी वाचून दाखविली व त्यावर राजाचें म्हणणें काय आहे? असा सवाल केला. राजानें आपल्या खणखणीत आवाजांत उत्तर दिलें, " न्यूकासल मुक्कामीं माझा विश्वासघात करून तुम्हीं माझा सौदा केला आहे. माझा प्राण घेऊं इच्छिणारे तुम्ही चांडाळ आहां. मी न्यायाधीश म्हणून तुम्हांला मानीत नाहीं आणि म्हणूनच तुमच्या ह्या प्रश्नाला उत्तरही देत नाहीं. " एवढेंच बोलून राजा उठला.

राजाला घेऊन पहारेकरी सभागृहांतून बाहेर पडले, इतक्यांत एका नीच इसमानें राजाच्या अंगावर थुंकण्याचा विक्रम केला. त्याचें हें नीच कृत्य चौघाही मित्रांच्या दृष्टीला पडलें. " एका फार्दिंगासाठीं स्वतःच्या बापालाही तो असें करण्यास मागेंपुढें पाहाणार नाहीं. " ॲथा लालभडक होऊन म्हणाला. चौघाही मित्रांनीं त्याचा पाठलाग चालू केला. त्या बिचाऱ्याला आपल्यापुढें काय वाढून ठेविलें आहे ह्याची कांहींच कल्पना नव्हती. कशी बहादुरी केली ह्याच ऐटींत तो आपल्या दोन मित्रांबरोबर हसत खिदळत चालला होता.

कांहीं वेळानें तें त्रिकूट नदीजवळील एका निर्जन गल्लींत शिरलें. आपल्या मागून कोणीतरी येत आहे ह्याची कल्पना ह्या ठिकाणीं त्यांना आली. थुंकणाऱ्या इसमाची मानगूट चटकन् पकडून डार्टा

म्हणाला, " तूं अत्यंत पाजी मनुष्य आहेस, कैदेंतील राजाचा असा उपमर्द करून तूं आज आपलं मरण ओढवून घेतलं आहेस ! "



त्या मनुष्यानें सुटण्याची धडपड केली पण व्यर्थ! त्याचे दोस्त केव्हांच पसार झाले होते. त्याला मारण्यासाठीं अरामीनें तरवार काढतांच डार्टा म्हणाला, " आपलीं हत्यारें असल्या क्षुद्र मनुष्यासाठीं नाहींत. " त्यानें त्याची मान दाबून पार्थाला खूण केली. तत्काळ पार्थानें आपल्या वज्रमुष्टीचा असा प्रचंड आघात त्याच्या मस्तकावर केला कीं फट्दिशीं त्याची कवची फुटून त्याचा मेंदू बाहेर पडला.

" ह्याला हेंच मरण ठीक ! " डार्टा त्याला धुळींत टाकून म्हणाला.



प्रकरण नववें

# चार्ल्स्‌ची फांशी

खर्र्ऽ खर्र्ऽऽ खट्‌ खट्‌. मध्यरात्रीचा सुमार होता. राजाला ज्या ठिकाणीं कैदेंत ठेवण्यांत आलें होतें, त्याला लागूनच वधस्तंभ उभारण्याचें काम चालू होतें. करवत, रंधा, इत्यादि आयुधांचा कर्कश आवाज ऐकून राजा जागा झाला. आपली ही शेवटची रात्र तरी शांत झोपेंत जावी, म्हणून त्यानें आपला आवडता हुजऱ्या प्यारी ह्याला बाहेर पहारेवाल्यांकडे विनंती करण्यास पाठविलें. प्यारी बाहेर येऊन सुतारांना म्हणतो, " भल्या माणसांनो, जरा सावकाश काम केलंत तर महाराजांना जरा तरी शांत झोप मिळेल ! "

" बरं बरं, तुझ्या महाराजांना म्हणावं, उद्यांपासून शांतच झोपायचं आहे ! " एकजण म्हणाला. त्या माणसाकडे प्यारीनें नीट निरखून पाहिलें व तो आंत गेला.

" हीं गोंगाट करणारीं माणसं कोण आहेत असं वाटतं महाराजांना ? " तो राजाला म्हणाला.

" असतील कोणी पोटभरू सुतार ! "

" मला वाटतं आपले फ्रेंच स्नेही ऑथा त्यांत आहेत. " प्यारी हळूच म्हणाला.

"आणि ते माझा वधस्तंभ तयार करीत आहेत?"

"त्याचबरोबर भिंतीला चोरून भोक पाडण्याचाही त्यांचा उद्योग चालू आहे."

इतक्यांत भिंतींत एक खुंटी मारण्याच्या निमित्तानें वर चढलेल्या अरामीनें खिडक्रींतून आंत पाहिलें.

"महाराज, आपल्या वधासाठीं नियुक्त केलेला चांडाळ आम्हीं नाहींसा केला आहे." तो हळूच म्हणाला. "उद्यां ऐन वेळीं चांडाळ न आल्यानें आपली शिक्षा अमलांत येणार नाहीं. तेवढीच फुरसत आम्हांला मिळेल. आम्ही आपल्या सुटकेच्या नादांत आहोंत."

त्या फ्रेंचांचे आपल्यासाठीं चाललेले हे उपद्व्याप पाहून राजाला भडभडून आलें. अरामी हळूच खालीं उतरून आपल्या उद्योगाला लागला.

राजाच्या शिरच्छेदाची वेळ आगाऊच शहरांत कळली असल्यानें दुसऱ्या दिवशीं राजवाड्याकडे माणसांची नुसती रीघ लागली होती. चांडाळ येणार नाहीं ही खात्री असल्यानें सुतारांनीं रात्रभर राबून वधस्तंभ पुरा करीत आणला होता. तक्तपोशीखालीं बसून ऑथा अद्यापही कांहीं ठोकाठोकी करीत होता.



इतक्यांत वाद्यांचा कर्णकटु आवाज त्याला ऐकूं आला व वर वधस्तंभापाशीं पावलेंही वाजूं लागलीं. "मी जनतेला उद्देशून थोडेंसें बोलणार आहें" हे राजाचे शब्दही त्याच्या कानीं आले. तो स्तंभित झाला.

"माझ्या मृत्यूनें देशाचें कल्याण होत असल्यास मी आनंदानें मरायला तयार आहें." राजा बोलत होता. क्रॉमवेलनें कोणीतरी नीच मनुष्य चांडाळ म्हणून ऐन वेळीं उभा केला!" ऑथा स्वतःशीं

म्हणाला. राजाची सुटका करण्याचा त्यांचा सर्व बेत धुळीला मिळाला. कटाची शंका आल्यानें क्रॉमवेलनें तडकाफडकीं राजाची शिक्षा अंमलांत आणण्याचें ठरविलें. ऑथानें बाहेर डोकावून पाहिलें. चांडाळानें तोंडावर बुरखा घेतला असल्यानें त्याचें तोंड दिसणें शक्य नव्हतें. राजानें आपली शेवटची प्रार्थना आटोपली व चांडाळाला आपण मरायला तयार असल्याचें सांगितलें.



खट्. चांडाळानें आपला परशू चालविला.

टप् टप्! तक्तपोशींतून खालीं रक्ताचे-थेंब पडूं लागले. ऑथाचें मस्तक सुन्न झालें. आपला हातरुमाल त्यानें त्या रक्तांत भिजवून घेतला.

सर्वत्र सामसूम झाल्यानंतर मंडळी खिन्न मनानें बिऱ्हाडाकडे यायला निघाली पण डार्टीचा पत्ता नव्हता. जोराचा हिमवर्षाव सुरू झाल्यानें विशेष हुडकाहुडकी न करतां त्यांनीं बिऱ्हाड गांठलें. घरीं येतांच एकाद्या निस्त्राण मनुष्याप्रमाणें ऑथा मटकन् खालीं बसला. "देव करो आणि असला प्रसंग फिरून आमच्या आयुष्यांत कधींही न येवो." तो म्हणाला.

इतक्यांत घाबऱ्या घाबऱ्या धापा टाकीतच डार्टी आंत आला.

" ह्या भयंकर देशांतून होतां होईल तितके लवकर बाहेर पडूं या ! " ऑथा त्याला केविलवाण्या स्वरानें म्हणाला.

" कां, फार घाई दिसते ? " डार्टीनें विचारलें.

" ज्याच्यासाठीं आलों तो राजा तर आज जगांतून नाहींसा झाला. " खालच्या मानेनें ऑथा उद्गारला.

" आजचा बुरखेवाला चांडाळ कोण होता, माहीत आहे तुला ? "

" मला तर तेंच गूढ आहे ! क्रॉमवेलला ऐन वेळीं हा चांडाळ कोण मिळाला ? "

" तो मान्शर मोर्डा होता ? "

" मान्शर मोर्डा ! " सर्वजण एकदम आश्चर्यानें ओरडले.

" होय ! मी आतांपर्यंत त्याच्याच पाळतीवर होतों. त्याच्या मकाणाचा पूर्ण पत्ता पाहूनच मग मी इकडे आलों. " डार्टा म्हणाला.

" फार छान ! "

" आज रात्रीं त्याचा फडशा पाडून नंतर आपला मार्ग सुधारूं ! "

रात्रीं सर्वांनीं आपल्या तरवारी कसल्या व बर्फाचा मारा सहन करीत ते डार्टाच्या मागून निघाले. थोड्याच वेळांत एका निर्जन ठिकाणीं एका झोपडीपाशीं येऊन ते उभे राहिले. डार्टीनें मोर्डाच्या पाळतीवर ग्रीमॉला ठेविलें होतेंच. तो त्यांना सामोरा आला. झोपडीच्या खिडकींतून मंद प्रकाश बाहेर येत होता.

" आंत किती माणसं आहेत ? " डार्टीनें ग्रीमॉला हळूच विचारलें.

" दोन ! " ग्रीमॉं उत्तरला, " एक मोर्डा असून दुसरा ठेंगणा गिड्डेलासा आहे. "

" ऑलिव्हर क्रॉमवेल ! " डार्टा उद्गारला.

डार्टा हळूच झोपडीपाशीं आला व आंतील संवाद ऐकण्याचा प्रयत्न करूं लागला. मोर्डाचें व क्रॉमवेलचें राजाच्या वधासंबंधीं कांहीं तरी

भाषण चाललें होतें. थोड्याच वेळांत भाषण बंद झालें व क्रॉमवेलही दिसेनासा झाला. डार्टाची खात्री झाली कीं क्रॉमवेल झोपडींतील एखाद्या चोरदरवाजानें नाहींसा झाला. मोर्डाही आंगावर कपडे लपेटून बाहेर पडण्यास सज्ज झाला. बाहेर लोक सावध होतेच. मोर्डा बाहेर येतांच चौघांनींही त्याला एकदम घेरलें व फिरून गचांड्या देत झोपडींत नेलें.

" मान्शार मोर्डा, एकमेकांविरुद्ध डाव खेळतां खेळतां आतां समोरासमोर गांठ पडली म्हणायची ! " डार्टा त्याला शांतपणानें म्हणाला.

मोर्डाला आश्चर्याचा एवढा धक्का बसला होता कीं त्याला काय बोलावें हेंच कळेना. त्यानें सुटकेच्या आशेनें इकडे तिकडे पाहिलें, पण ह्या गराड्यांत आपण पूर्ण निराधार आहोंत हें कळायला त्याला विलंब लागला नाहीं.

" तुमची वेषान्तराची कला मोठी और आहे. आपण सकाळींच चांडाळ बनला होतां नाहीं ? " डार्टाला वाटलें आपल्या ह्या प्रश्नानें मोर्डा अगदीं गारठून जाईल.

" पण आतां ती भूमिका आपण घेतली आहे ! " तो खवचटपणानें म्हणाला.

" छे छे ! असं मात्र समजूं नका हं ! " डार्टा म्हणाला, " आम्हा चौघांपैकीं कुणाशींही द्वंद्व खेळून आपण आपल्या वैराचा निकाल लावून घ्यावा. "

" ह्या हलकटाला हा मान .... " अरामी म्हणाला.

" चूप ! त्याचा खून करण्याची जशी आम्हांला इच्छा नाहीं तशी त्याला जिवंत सोडण्याचीही नाहीं. तेव्हां ह्यांतून सुटण्यास एवढा एकच इलाज ! " डार्टा म्हणाला.

" मला तेवढी भिंतीवरील तलवार घेऊं दे मग ! " मोर्डा म्हणाला.

" जरूर ! "

मोर्डानें तलवार घेण्यासाठीं खुंटीला हात घातला मात्र, खटकन् चोर-दरवाजा उघडून मोर्डा भिंतींत गडप झाला. चौघेही मित्र आ5 वासून एकमेकांकडे पाहूं लागले. " आतां इथून आपल्याला जीव घेऊन पळालं पाहिजे. " डार्टा म्हणाला. कुमक घेऊन कोणत्या क्षणाला मोर्डा येईल व त्याच्याच सापळ्यांत कोणत्या क्षणीं सापडण्याचा प्रसंग येईल हें सांगणें शक्य नव्हतें. तत्काळ सर्वांनीं तेथून काढता पाय घेतला.





2028

प्रकरण दहावें

# धडाड् धूम !

मोर्डा ह्या चौकडीच्या हातून निसटला तरी स्वस्थ मात्र बसला नाहीं. चोरवाटेनें बाहेर पडल्याबरोबर त्यानें बंदराचा रस्ता पकडला. ते चौघेही फ्रेंच इसम फ्रान्सला जाण्यासाठीं आतां विलंब करणार नाहींत ही त्याला खात्री होतीच. विंटर ज्या गलबतामधून ऑथा-अरामीला घेऊन आला होता त्याचा कप्तान राजपक्षीय असल्यानें हे चौघेही त्याच्याच आश्रयाला येणार हें तो ओळखून होता. म्हणून बंदरांत येतांच प्रथम त्यानें त्या गलबताचा तपास केला. त्यांत मोर्डाला अधिकच माहिती मिळाली. राजा हातीं येतांच पळून जाण्यासाठीं म्हणून ऑथानें गलबतावरील सर्व लोकांना तयारींत राहाण्याची सूचना देऊन ठेविली होती. एवढेंच काय पण गलबतावर दारूगोळाही सज्ज करून ठेवण्यांत आला होता. गलबताचा कप्तान ग्रास्लो किनाऱ्यावर गेल्याची संधि साधून मोर्डानें खलाशांना पैसे देऊन योग्य ती माहिती पैदा केली. एवढेंच काय पण एका खलाशाच्या खोलींत आपल्यासाठीं जागाही पैदा केली.

त्याच दिवशीं रात्रीं चौघेही मित्र बंदरांत आले व तेथील पथिकाश्रमांत त्यांनीं ग्रास्लोला गांठलें. त्यांनीं तत्काळ आपल्याला फ्रान्सला नेऊन

सोडण्याची त्याला विनंती केली. ग्रास्लोनें त्यांना होडींतून गलबतावर नेलें व गलबत फ्रान्सच्या दिशेनें प्रवास करूं लागलें. दिवसभर झालेल्या दगदगीनें सर्वांना अगदीं शिणल्यागत झालें होतें. बिछान्यावर आंग टाकतांच सर्वांना गाढ झोप लागली.

ऑथाचा नोकर ग्रीमाँ व पार्थोचा नोकर मास्कटाँ अद्याप जागेच होते. त्यांचा जीव भुकेनें व तहानेनें व्याकुळ झाला असल्यानें कोठेंतरी मद्य मिळाल्यास डल्ला मारावा ह्या विचारांत ते होते. "ग्रीमाँ, तहानेनें तर जीव व्याकुळ झाला आहे बुवा !" मास्कटाँ म्हणाला.

"मग टाक समुद्रांत उडी आणि ढोस पाणी." कातावलेला ग्रीमाँ म्हणाला.

"दारूची तहान कुठें पाण्यानें भागते होय ?"

"मग बघ हळूच जाऊन त्या कोठारांत कांहीं हाताला लागतं का ?" ग्रीमाँ गलबतावरील कोठाराकडे बोट दाखवून म्हणाला. मास्कटाँनें चोरी करावी व आपण फुकटचा वांटा उचलावा असा त्याचा साजूक बेत होता. मास्कटाँ तयारदेखील झाला पण इतक्यांत कांहीं चाहूल लागल्यामुळें दोघेही मुस्कट मारून मप्प पडून राहिले. दोन व्यक्ति चोरपावलांनीं कोठाराकडे येत होत्या. एकीच्या हातांत कसलेंतरी भेंडोळें होतें. दोनही व्यक्ति हळूच कोठारांत शिरल्या व थोड्याच वेळांत परत आल्या.

"हें पाहा, ही वात पांच मिनिटं जळेल, तेवढ्या वेळांत सर्व उरकलं पाहिजे."

"ठीक आहे."

"बरोब्बर सव्वा बारा !"

"गलबताच्या उजव्या बाजूला होडी तयार आहे."

"ठीक आहे."

ग्रीमॉंखेरीज दुसरा कोणी तेथें असता तर तो खास ओरडलाच असता. बोलणाऱ्या व्यक्तींपैकीं एक मोर्डा आहे हें त्याला दिव्याच्या मंद प्रकाशांत दिसून आलें. पण तो कांहींएक बोलला नाहीं.

"ह्या कामांत धोका आहे."

"त्याची तुला काळजी नको. आपण वांचलों म्हणजे झालं ना? बाकीच्या सर्व राजपक्षीयांना आज जलसमाधि देण्याचा माझा निश्चय आहे!"

त्या दोन व्यक्ति नाहींशा होतांच ग्रीमॉं हळूच उठला व कोठारांत गेला. एका पिपाला भली मोठी वात लावलेली त्याला दिसून आली. दारूच्या कोठाराला आग लावून पळण्याचा मोर्डाचा कावा त्याच्या लक्षांत आला. त्यानें तत्काळ डार्टाकडे धाव घेतली. डार्टानें ग्रीमॉं व मास्कटॉंची हकीकत ऐकून घेतली व आपल्या मित्रांना जागें केलें. "समोरच्या खिडकींतून समुद्रांत उडी टाकून आतां सुटका करून घेतली पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं." डार्टा म्हणाला. "खलाशी फितूर झालेले दिसतात."

"फार थंडी आहे रे!" अरामी म्हणाला.

"मग बैस इथेंच, म्हणजे चांगला शेक मिळेल." डार्टा उत्तरला.

मोर्डाच्या तंगड्या त्याच्याच गळ्यांत कशा घालाव्यात ह्याचा नक्की निर्णय डार्टानें तत्काळ केला. बरोबर सव्वा बाराला मोर्डा दारूला बत्ती दिल्याशिवाय राहाणार नाहीं ह्याची त्याला खात्री होती. गुपचुपपणें सर्वांनीं ग्रास्लोला घेऊन गलबताच्या उजव्या बगलेला दोराला बांधून सोडलेली होडी गांठली. तेथें उभ्या असलेल्या खलाशाला त्यांनीं हूं कां चूं करण्यालाही संधि दिली नाहीं. होडींत उतरतांच दोर कापून टाकण्यांत आला व गलबतापासून होडी शक्य तों दूर नेण्यासाठीं सपासप् वल्हीं मारण्यांत आलीं.

जहाज समुद्राच्या लाटांवर हेलकावे खात सावकाश चाललें होतें.

" मोर्डा आणि त्याचे खलाशी दोस्त आतां मोठी मजा चाखतील ! " घोंगट मारून बसलेला अरामी म्हणाला.

समुद्रावर दाट काळोख पसरला असल्यानें दूर राहिलेलें जहाज आतां एखाद्या काळ्या ठिपक्याप्रमाणें दिसूं लागलें होतें.

" आतां लवकरच आपल्याला कांहीं तरी चमत्कार पाहायला मिळेल. " डार्टा म्हणाला.

इतक्यांत गलबतावर कांहीं हालचाल दिसूं लागली. मशाल हातीं घेतलेली एक व्यक्ति गडबडीनें वावरतांना दिसूं लागली. बत्ती पेटवून चाललेला तो मोर्डाच होता. तो धावत होडीकडे आला पण मृतवत् पडलेला तो खलाशी पाहून त्याची बोबडी वळली. त्यानें दोराला हिसका देऊन पाहिलें. होडी घेऊन त्याचीं सावजें केव्हांच निसटलीं होतीं.

मोर्डानें निराशेनें कपाळावर हात मारून घेतला. त्याच्या हातांतील मशाल गळून पडली, पण लगेच सावध होऊन त्यानें समुद्रांत उडी टाकली. इतक्यांत धडाऽऽड असा प्रचंड स्फोट झाला व गलबताचे तुकडे हवेंत उडाले. कांहीं काळपर्यंत पाण्यावर स्वच्छ प्रकाश पडला व फिरून सर्वत्र शांत झालें.

होडींतील मित्रांना तो भीषण प्रकार पाहून चांगलाच धक्का बसला. प्रत्येक जण खिन्न होऊन न बोलतां आपापल्या जागीं बसला होता.

" आतां मात्र खास सर्व आटोपलं ! " ऑथा म्हणाला.

इतक्यांत जणूं कांहीं त्याचें म्हणणें खोटें ठरविण्यासाठीं अंधारांतून हाक आली, " महाराज, मला वांचवा. जरा हात द्या ! "

आवाजासरशीं दचकून सर्वजण इकडे तिकडे पाहूं लागले.

" मान्शर मोर्डा ! " ग्रीमाँ ओरडला, " त्याचाच हा आवाज. "

" तोच तो ! " ऑथा उद्गारला.

सर्वजण डोळे फाडफाडून अंधारांत समुद्रावर पाहाण्याचा प्रयत्न करूं लागले.

" तो पाहा ! तो पाहा ! ! " ऑथा एकीकडे बोट करून म्हणाला.

एक मनुष्य धडपड करीत पोहत होडीकडे येण्याचा प्रयत्न करीत असतांना सर्वांच्या दृष्टीला पडला.

" त्याला परमेश्वरानें खास लोखंडाचा बनविला आहे. " पार्थी वल्हें सरसावीत म्हणाला. मोर्डानें पाण्यावर कांहीं हात मारले व तो दीनवाणीनें ओरडला, " दया करा. मला वांचवा, नाहीं तर मी बुडतों. "

" दुर्दैवी विचारा ! " उदार मनाचा ऑथा उद्गारला.

" वाऽ वाऽऽ जरा एखाद्यानें तोंड वेंगाडलं कीं फुटलाच आमच्या ऑथाला पाझर ! पार्थी, मार वल्हं ! " डार्टा म्हणाला. " मरूं दे त्याला खुशाल ! "

दोन सपाट्यांत होडी मोर्डापासून दूर गेली.

" अरेरे ! असं काय करतां ? " ऑथा रडकुंडीला येऊन म्हणाला.

" मेहेरबानी करा ! दया करा ! ! मला सोडूं नका ! ! ! " मोर्डा ओरडला.

" अरे जा ! पश्चात्तापावर विश्वास ठेवण्याइतके आम्ही खुळे नाहीं ! " डार्टा म्हणाला.

" माझी बंदूक नाहीं रे. नाहीं तर ह्याची ही पिर पिर मीं केव्हांच बंद केली असती. " अरामी उद्गारला.

" महाराज, मला खरोखर पश्चात्ताप होत आहे. मी अजून तरुण आहें. मला मारूं नका ! " मोर्डा दीनपणानें याचना करूं लागला. बोलतां बोलतां मोर्डाचें हात मारण्याचें काम चालू होतेंच.

" तुझा शेवट असाच झाला पाहिजे " डार्टा म्हणाला. " तुझीं पातकं भयंकर आहेत. "

“ तूं असा होडीपाशीं तरी ये. एका फटकाऱ्यांत तुझ्या मस्तकाच्या चिंध्या करतों.” पार्था वल्हें वर घेत म्हणाला.

ऑथा ओरडून म्हणाला, “ भल्या गृहस्थांनो, तुम्हीं हें काय मांडलं आहे? जरा तरी माणुसकी दाखवाल कीं नाहीं:?” तो तत्काळ पुढें झाला व होडींतून वाकून त्यानें मोर्डाला हात देण्याची तयारी केली. मोर्डाला आनंद झाला. त्यानें आटापीट करून होडीकडे येण्यासाठीं हात मारायला सुरुवात केली.

“ हा पाहा, मी इथें आहें. माझा हात धरून वर ये.” ऑथा म्हणाला व त्यानें खूप पुढें वाकून मोर्डाला हात दिला. ऑथाचा हात हातीं येतांच मोर्डा त्वेषानें ओरडला, “ निदान हा एक तरी बळी मिळाला ! ”



त्यानें ऑथाला खस्कन् होडींतून पाण्यांत ओढलें व कमरपट्ट्यांतील खंजीर काढून ऑथाच्या मस्तकावर तो आतां आघात करणार तोंच फट्ट असा आवाज होऊन त्याच्या हातांतील खंजीर गळून पडला. पार्थानें मारलेल्या वल्ह्याच्या प्रचंड आघातानें मोर्डाच्या मस्तकाच्या अक्षरशः चिंध्या झाल्या. सर्वांनीं काळाच्या दाढेंतून वांचलेल्या ऑथाला वर ओढून घेतलें.

" मी आधींपासून सावध होतों. तें बाळ कांहींतरी गुण उधळल्या-शिवाय राहाणार नाहीं ह्याची मला खात्री होतीच." पार्थी म्हणाला.

" शाबास दोस्त ! फार नामी कामगिरी केलीस तूं आज." अरामी म्हणाला.

" ऑथाला आतां उठल्या सुटल्या माणुसकी दाखविण्याची लहर येणार नाहीं." डार्टानें मल्लीनाथी केली. थंडीनें काकडणाऱ्या ऑथाला पाहून साऱ्यांनाच हसूं लोटलें.

" मला तुम्ही असं खिजवून मारणार असाल तर मी आपला परत समुद्रांत उडी मारतों." ऑथा म्हणाला.

" सावध राहा. नाहींतर अजूनही मोर्डा तुझ्या उरावर बसेल तेथें." डार्टा उद्गारला.

सकाळच्या वेळीं त्यांना एक जहाज दिसलें. सर्वांनीं आरडाओरडा करून, वल्हीं नाचवून, टोप्या उडवून, जहाजावरील लोकांचें लक्ष आपणांकडे वेधून घेतलें. जहाज फ्रेंच असल्यानें त्यांची तत्काळ सुटका झाली व लवकरच सर्वजण सुखरूपपणें बोलोनला येऊन पोचले.





प्रकरण अकरावें

# डार्टाची अटक आणि ऑथाची फसगत

बंदरांत उतरतांच, एखाद्या पथिकाश्रमांत मुक्काम टाकून जरा चैन करावी असें पार्थाच्या मनांत फार होतें. पण बंदरांत उतरल्यापासून प्रत्येकजण आपल्याकडे संशयी नजरेनें पाहात असावा अशी सर्वांनाच शंका आल्यानें त्यांना आपला बेत बदलणें भाग होतें.

" इथें राहातां येत नाहीं तर नाहीं, पण सर्वजण मिळून पारीसला तरी जाऊं." पार्था म्हणाला. पण एकत्र प्रवास करणें डार्टाला पसंत पडलें नाहीं. तो म्हणाला, " माझारीननें मला व पार्थाला क्रॉमवेलकडे पाठवलं आणि आम्हींतर क्रॉमवेलच्या विरुद्ध उचापती केल्या. तशांतच ऑथा व अरामी ह्यांच्याबरोबर जर आपण सापडलों तर तो नक्कीच आपली वाट लावील. तेव्हां आपण विभक्तपणेंच प्रवास करावा हें बरं." ऑथाला एकत्र प्रवास करणेंच पसंत होतें पण डार्टा अनुकूल नसल्यानें त्यानें विशेष ओढून धरलें नाहीं.

" पण मा म्हणतों, इंग्लंडमध्यें आपण काय भानगडी केल्या हें माझारीनला आतां सांगणार कोण? मोर्डाचा तर निकाल लागला!" पार्थानें शंका काढली.

" बाबा रे क्रॉमवेल जिवंत आहे ना अजून. त्याला कांहीं अज्ञात नाहीं. माझारीनकडे एव्हांना त्यानें आपल्या विरुद्ध कागाळी केलीही असेल."

डार्टा म्हणाला, "माझारीनची प्रत्यक्ष गांठ पडून त्याची कशीतरी बोळवण करीपर्यंत आपल्याला सावधच राहिलं पाहिजे." शेवटीं ऑथा व अरामी ह्यांनीं पारीसचा रस्ता धरला व डार्टा-पार्था माझारीनकडे जाण्यासाठीं निघाले.

राजकुमार व राणी पारीसमधून निघून गेल्यापासून पारीसचें एकंदर स्वरूप पार बदलून गेलें होतें. लोकपक्षीय पुढाऱ्यांनीं शहर ताब्यांत घेतलें व लोकसभेमार्फत एक शिष्टमंडळ पाठवून राणीला राजधानीला परत येण्याची विनंती केली. राणी परत तर आली नाहींच पण उलट शिष्टमंडळाला धमकी देऊन तिनें कळविलें कीं बऱ्या बोलानें ब्यूफोर वगैरे लोकपक्षीय पुढारी शरण आले नाहींत तर पारीसवर स्वारी करून त्यांची खोड मोडण्यांत येईल. ह्या धमकीचा परिणाम मात्र भलताच झाला.

"माझारीन देशाचा शत्रु असून, त्याला राणीनें आठ दिवसांत हद्दपार करावें." असा ठराव लोकसभेनें केला व पारीस लढविण्याची तयारी केली. इंग्लिश राज्यक्रांतीच्या बातमीनें तर लोकांचें अवसान चांगलेंच वाढलें. पारीसची संपूर्ण नाकेबंदी करण्यांत येऊन रस्तोरस्तीं खंदक काढण्यांत आले.

ऑथा व अरामी पारीसच्या वेशीपाशीं आले. पण त्यांना आंत सोडणार कोण? आपण मध्यंतरीं इंग्लंडांत असल्यानें आपल्याला ह्या नव्या घटनांची कांहीं एक माहिती नाहीं, वगैरे त्यांनीं खूप सांगितलें. पण ओळखीशिवाय आंत सोडण्याचें चौकीदारांनीं साफ नाकारलें.

इतक्यांत एक अधिकारी ताड् ताड् करीत तेथें आला.

"कोण, प्लँशे! अरे काय रुबाब आणला आहेस हा!" अरामी ओरडला.

तो प्लँशे होता. त्यानें तत्काळ अरामी व ऑथा ह्यांना आंत सोडलें व डार्टाची चौकशी केली. ऑथानें डार्टा-पार्था माझारीनकडे गेल्याचें त्याला सांगतांच प्लँशे दांतओठ खाऊन म्हणाला, "त्या थेरड्यानें त्यांना दगा

केला आहे. मान्शार ऑथा, तुम्ही दोन दिवस वाट पाहून त्यांच्या तपासाला जा! माझारीननें त्यांना तुरुंगांत टाकल्याची बातमी आहे. जरूर लागली तर मलाही बोलवा."

ग्लॅशेचें भाषण ऐकून ऑथा व अरामी चकित झाले. त्याच बरोबर डार्टीच्या हुशारीचें त्यांना कौतुकही वाटलें. "बोलोनला डार्टीनें केलेला अंदाज खरा ठरला म्हणायचा." अरामी म्हणाला.

"डार्टीच्या बुद्धिमत्तेला तोड नाहीं. दुर्दैव त्याचं, तो असल्या घाणेरड्या राजवटींत जन्माला आला आहे." ऑथा उत्तरला.

दोन दिवस सोडून तीन चार दिवस त्यांनीं डार्टी-पार्थीसाठीं पारीस-मध्यें वाट पाहिली पण त्यांचा कांहींच पत्ता न लागल्यानें ऑथा सेंटजर्मेन-कडे जाण्यास तयार झाला. राणीची प्रत्यक्ष गांठ घेऊन डार्टीसंबंधीं कांहीं उलगडा झाल्यास पाहावा असा त्याचा विचार होता. आपल्यालाही कांहीं दगा फटका झाल्यास मागें कांहींतरी हातपाय हालवायला जागा राहावी म्हणून अरामीनें नुसतें ऑथाच्या पाळतीवर राहावें असें ठरलें. सेंटजर्मेनला गेल्यानंतर राणीची गांठ घ्यायला ऑथाला फारशी अडचण पडली नाहीं. राणी ज्या दिवाणखान्यांत होती तेथेंच माझारीनही एखाद्या कारकुना-प्रमाणें कांहीं कागदपत्रें चाळीत बसला होता.

"माझे दोन मित्र डार्टी व पार्थी माझारीननीं कांहीं कामाकरितां इंग्लंडला पाठविले होते, ते फ्रान्समध्यें परत आल्यापासून त्यांचा कांहीं एक पत्ता नाहीं." ऑथा राणीला उद्देशून पण माझारीनला ऐकूं जाईल अशा बेतानें म्हणाला.

"मग तुमचं काय म्हणणं आहे?" राणीनें विचारलें.

"मी त्यांची कांहीं वार्ता कळेल ह्या आशेनें आलों आहें."

"चुकलेल्या माणसांचा तपास करण्याचं काम पोलीसांचं आहे, राणीचं नाहीं." राणी तोऱ्यानें फणकारली.

" राणीसाहेबांनीं माझारीनकडे चौकशी केल्यास माझं काम होईलसं वाटतं. ह्या बाबतींत पोलीस कांहीं करूं शकतीलसं वाटत नाहीं. "

" मग तुम्हीच हा प्रश्न त्यांना विचारावा हें उत्तम !" राणी झटक्यानें म्हणाली.

" हा प्रश्न डार्टासंबंधीं असल्यानें राणीसरकार त्यांत विशेष लक्ष घालतील ह्या आशेनें मीं आपल्याला विनंती केली होती एवढंच ! "

इतक्यांत माझारीन स्वतःच पुढें आला व म्हणाला, " ही गोष्ट राणीसरकारना माहीत असण्याचं कारण नाहीं. डार्टानीं हुकूम अमान्य केल्यानें ते आपल्या मित्रासह सध्या अटकेंत आहेत. "

माझारीनकडे लक्ष न देतां ऑथा राणीला म्हणाला, " त्यांची अटक रद्द व्हावी असा हुकूम मिळावा अशी माझी सरकारना विनंती आहे. "

" हा शिस्तीचा प्रश्न आहे. " राणी म्हणाली.

" वीस वर्षांपूर्वी आपल्यासाठीं प्राण धोक्यांत घालणाऱ्या डार्टासंबंधीं राणीसाहेब हें उत्तर देत आहेत ! " ऑथा शक्य तितका शांतपणाचा आव आणीत म्हणाला व जाण्यासाठीं परत वळला.

" तुम्हीसुद्धा डार्टाच्याबरोबर ह्या खेपेला इंग्लंडला गेलां होतां काय ? " माझारीननें विचारलें.

" ह्या प्रश्नाचं उत्तर मीं दिलंच पाहिजे असं मला वाटत नाहीं. " ऑथा मागें न पाहातांच म्हणाला. खालीं चौकांत राणीला भेटण्यासाठीं आलेल्या अनेक लोकांची गर्दी जमली होती, तिकडे पाहात तो चालला असतां त्याच्या खांद्यावर कोणींतरी हात ठेविला.

" कोण कामिंग ? "

" होय काउंट ऑथा ! "

" काय काम आहे ? "

" मला आपल्याला अटक करण्याचा हुकूम झाला आहे. "

" ठीक आहे ! अरामी सावध, मी अडकलों ! ! " ऑथा ओरडला.

ऑथाची ही गर्जना खालीं गर्दींत वावरणाऱ्या अरामीच्या कानीं गेली. त्यानें हळूच तेथून काढता पाय घेतला.

" ह्या चौघांपैकीं तीन हातीं लागले, चौथाही लवकरच मिळेल. मग ही जुनी आठवण काढून ते वारंवार राणीसाहेबांना त्रास देऊं शकणार नाहींत. मी त्यांना स्वतः माझ्या देखरेखीखालीं कैदेंत ठेवणार आहें. " राणीला शांत करण्याचा प्रयत्न करीत माझारीन म्हणाला.

राणीनें एक दीर्घ सुस्कारा टाकला व ती म्हणाली, " पण ते कैदेंत टिकले तर ना ? "

* * *

माझारीन सेंटजर्मेनला राणीला भेटण्यासाठीं येई, तरी पण त्यानें आपला स्वतंत्र असा मुक्काम रुईच्या किल्ल्यांत टाकला होता. राणीचा निरोप घेऊन रुईला जाण्यासाठीं तो आपल्या गाडींत चढला. गाडीबरोबर पहाऱ्यासाठीं म्हणून त्यानें अनेक घोडेस्वार घेतले होते. सर्वांच्या मागून कामिंग व ऑथा घोड्यावरून येत होते. ऑथाभोवतीं सशस्त्र स्वारांचा गराडा होताच. लोकांच्या गर्दींत मिसळून अरामी व ग्रीमाँ हा सारा देखावा पाहात होते. रुईच्या किल्ल्यांत पोचतांच कामिंगनें ऑथाला कोठें ठेवायचें ह्यासंबंधीं माझारीनकडे विचारणा केली. डार्टा व पार्था ह्यांना जेथें ठेवण्यांत आलें होतें त्याच्या अगदीं विरुद्ध दिशेस असलेल्या आपल्या निवासस्थानापाशीं माझारीननें ऑथाची व्यवस्था करण्यास सांगितलें. रुईचा किल्ला खरा तुरुंग नसल्यानें स्थानबद्धतेखेरीज तुरुंगवासाची खरी जाणीव होण्याजोगें तेथें कांहींच नव्हतें. माझारीनच्या पहाऱ्यांत अडकून पडणें एवढाच त्याचा अर्थ होता, पण स्वतंत्र वृत्तीच्या ह्या तीन शिलेदारांना हेंही परवडणें शक्य नव्हतें. डार्टा-पार्थाची प्रत्यक्ष दृष्टिभेट होणें अशक्य झाल्यानें ऑथानें आपली हकीकत त्यांच्या कानांवर घालण्याची कामिंगला विनंती केली व कामिंगनेंही ती मानली.

डार्टा आणि पार्थी ह्यांना कैद करून किल्ल्यांत आणून ठेविल्यापासून दोघांचीही स्थिति मोठी चमत्कारिक झाली होती. डार्टा संतापानें वाटेल त्याच्यावर तोंड सोडी तर पार्थी डोळे मिटून कोपऱ्यांत पडून राही. बॅरन होण्यासाठीं माझारीनकडे तो आला व कैदेंत पडला. त्याची ही अवस्था व्हायला आपणच कारणीभूत झालों असें डार्टाला वाटत असल्यानें तर त्याचें मन त्याला फारच खाई. सायंकाळची वेळ होती. खोलीच्या खिडकींतून दिसणाऱ्या आकाशाकडे पाहात गजाला धरून डार्टा उभा होता. थोड्या वेळानें तो एकदम पार्थीकडे आला व त्याला गदगदां हालवून म्हणाला, " ए गृहस्था! तुझी झोप संपणार तरी केव्हां? चार दिवस झाले आज, पाहातों आहें, सारखा झोपा काढतो आहेस. सूर्य उगवतो आहे, मावळतो आहे, तूं आपला स्वस्थ!"



" मग आतां काय करावं म्हणतोस?"

" अरे, कांहींतरी हातपाय हालवायला नकोत का:? कीं इथेंच खितपून मरायचं आहे?"

" मग मीं काय तुला नको म्हटलं आहे ? "

" एखाद्या पहारेवाल्याचा आतां मुडदा पाडूं या नि पाहूं या कांहीं जमतं का ! "

" आणि जर कांहीं चाहूल लागली तर पडूं या अंधारकोठडींत ! "

" तेंही खरंच म्हणा ! "

" आपले खाण्यापिण्याचे तर कांहीं हाल नाहींत ना इथें ? "

" वाऽ म्हणजे खायला मिळालं तर इथेंच कायमचा मुक्काम टाकण्याचा तुझा विचार दिसतो आहे मला ! "

इतक्यांत त्यांचें भोजन घेऊन कार्मिग आला. अन्न मेजावर व्यवस्थित ठेवून पहारेवाला निघून जातांच कार्मिग म्हणाला, " मान्शर डार्टा, मी तुम्हांला आज एक आनंदाची बातमी सांगणार आहें. "

" माझारीनचा कोणीं खूनबीन केला काय ? "

डार्टाच्या ह्या प्रश्नानें कार्मिगला हसूं लोटलें. तो म्हणाला, " भले महाराज ! नाहीं म्हटलं तुमचे दोस्त ऑथा .... "

" काय तुम्हांला भेटला होता ? "

" जरा दमानें घ्याल का ? "

" बरं. तो खुशाल आहे ना ? "

" अगदीं खुशाल ! तुमच्याप्रमाणेंच तेही माझारीनचा पाहुणचार घेत आहेत सध्या ! "

" ऑथा इथें कैदेंत आहे ? " पार्था ओरडला.

" ऑथाला कैद ? कशासाठीं ? " डार्टा ओरडला.

" तुम्हांला जें कारण तेंच त्यांना ! माझारीनच्या राजवटींत आहोंत आपण. " माझारीनचा विश्वासू ( ? ) नोकर कार्मिग म्हणाला.

डार्टा निराशेनें मटकन् खालींच बसला.

" निराश होण्याचं कारण नाहीं, मान्शार डार्टा." कामिंग त्याचें सांत्वन करूं लागला.

" तुम्ही माझा एक निरोप ऑथाला कळवाल का?" डार्टानें विचारलें.

" कोणता तो?"

" त्याला म्हणावं, आम्ही इथें कसेतरी दिवस कंठीत आहोंत."

" एवढंच ना?"

" एवढंच!"

कामिंग त्यांचा निरोप घेऊन बाहेर पडतांच डार्टानें पार्थाला जवळ-जवळ मिठीच मारली.

" सबूर, सबूर, मेरे दोस्त!" डार्टाचा आनंद पाहून विस्मित झालेला पार्था ओरडला.

डार्टाच्या आनंदाचें कारण मात्र त्याला कांहींच उमगलें नाहीं.

" ए पार्था, आपण इथून आतां खास सुटलों म्हणूनच समज!"

" तें कसं काय बुवा?"

" आधीं खादीला बस बघूं. पोटभर खाऊन तरी घेऊं. मग सांगतों तुला काय करायचं तें."

दोघेही मेजावरील खाद्यपदार्थांवर तुटून पडले.





प्रकरण बारावें

# सुटका !

रुईच्या किल्ल्यांतील बहुतेक सर्व शिबंदी स्विस लोकांचीच होती. डार्टा व पार्था ह्यांच्यावर दोन शिपायांचा पहारा असे. रात्रीची वेळ होती. थंडी म्हणजे मी म्हणत होती. पहाऱ्यावरील दोन शिपायांपैकीं एक कोठें झुकला होता कोणास ठाऊक! दुसरा बिचारा थंडीनें कुडकुडत बाहेर येरझारा घालत होता. पार्थानें खिडकीचा एक गज आपल्या प्रचड सामर्थ्यानें केव्हां उपटून काढला तेंही त्याच्या ध्यानीं आलें नाहीं.

"काय रे दोस्त, मद्याचे दोन घोट घेणार का?" डार्टानें त्या कुडकुडणाऱ्या पहारेवाल्याला विचारलें. ह्या राजेशाही कैद्यांचा त्या भाडोत्री पहारेवाल्यांना नेहमींच हेवा वाटे. डार्टाच्या ह्या आमंत्रणानें तो खूष झाला व मोठ्या आनंदानें आंत आला. तत्काळ पार्थाचा गज त्याच्या डोक्यांत बसला व हूं का चूं न करतां त्यानें तेथेंच लोळण घेतली. हां हां म्हणतां डार्टानें त्याचा पोशाख चढविला व हत्यारें घेऊन पार्थाच्या खोलीवर पहारा सुरू केला. इतक्यांत दुसरा पहारेकरी आला, त्याला आपल्या दोस्ताची काय अवस्था झाली आहे ह्याची कांहींच कल्पना नसल्यानें डार्टालाच आपला दोस्त समजून तो मोठ्या खुशींत जवळ आला. तत्काळ डार्टानें त्याच्यावर झडप घातली व पार्थाचा गज त्याच्याही मस्तकावर आदळला. पार्थानें त्याचे कपडे व हत्यारें ताब्यांत घेतलीं. ह्या दोन्ही पहारेकऱ्यांना

खचाटून व त्यांच्या तोंडांत बोळे देऊन आणि कोठडींत अंधार करून पार्थो व डार्टा पहारेकऱ्याच्या पोषाखांत निश्चिंतपणें बाहेरील चौकांत आले. इकडे माझारीन हातांत कंदील घेऊन बाहेर पडलेला त्यांना दिसला. किल्ल्यांत कोठेंतरी एकान्तांत बसून रात्रीच्या वेळीं माझारीन विचार करीत असतो अशी आख्यायिका त्यांनीं ऐकलीच होती. माझारीनची ही काय भानगड आहे त्यावर पाळत ठेवण्याचें डार्टा-पार्थोनीं ठरविलें व गुपचुपपणें त्याचा पाठलाग सुरू केला. एका विवक्षित ठिकाणीं येऊन माझारीननें एक दार उघडलें व आंत जाऊन दार फिरून बंद करून घेतलें.

डार्टानें दाराला कान लावून पाहिला पण कांहींच हालचाल ऐकूं आली नाहीं. शेवटीं पार्थोच्या खांद्यावर उभें राहून त्यानें दारावरून आंत खालीं डोकावलें. ह्या ठिकाणीं उघडी जागा असून आंत झाडांच्या बऱ्याच कुंड्या ठेवलेल्या होत्या. एका विवक्षित कुंडीपाशीं येतांच माझारीननें ती कुंडी उचलली व कुंडीखालीं असलेल्या विवरांत प्रवेश केला. थोड्याच वेळांत चण् चण् असा नाणीं मोजल्याचा आवाज डार्टाच्या कानीं आला. "अरे थेरड्या, एकान्तांत तुझा हा विचार चालतो काय?" डार्टा पुटपुटला. थोड्याच वेळांत माझारीन वर आला. डार्टा-पार्थो झटकन् दूर होऊन दडून बसले. माझारीननें मग ऑथाच्या खोलीकडे मोर्चा वळविला. झाडा-आडून लपत छपत डार्टा-पार्थो त्याच्या मागें होतेच. ऑथाच्या खोलीपाशीं येतांच माझारीन जरा घुटमळल्यागत झाला. पण त्याला काय वाटलें कोणास ठाऊक, दार न उघडतांच तो परत फिरला. ऑथाच्या खोलीची किल्ली त्यानें स्वतःपाशींच ठेविली होती. तो घरीं जाण्यासाठीं वळणार इतक्यांत डार्टा-पार्थो त्याच्या दोन बाजूंनीं पुढें आले. डार्टा त्याला अदबीनें म्हणाला, "महाराजांनीं आता जातीनें तसदी घेण्याचं कांहींच कारण नाहीं. पाहिजे असेल तर हा बंदा नोकर ऑथाची खोली उघडून देत आहे."

डार्टाला पहारेवाल्याच्या वेषांत समोर पाहातांच माझारीनची बोबडीच वळली.

" कोण मान्शर डार्टा ! " तो अर्धवट शब्दांत पुटपुटला.



" होय महाराज. मीच तो. " नम्रतेचा भलताच आव आणीत डार्टा म्हणाला. " आणि हे माझे स्नेही मान्शर पार्था ! महाराज आतां कौंट ऑथाच्या भेटीस चालले होते नाहीं ? मग महाराजांनीं परत फिरण्याचं कारण नाहीं. चलावं तिकडेच. आम्ही येत आहोंतच बरोबर सोबतीला ! "

आपला गुप्त द्रव्यसंचय ह्या डाकूंनीं पाहिला कीं काय अशी शंका प्रथम माझारीनला आली होती, पण डार्टाच्या बोलण्यावरून त्याला खात्री वाटली कीं ऑथाच्या खोलीपाशींच फक्त ते राखुळत असावेत आणि त्यामुळें त्याला एक प्रकारें समाधान वाटलें.

" कमाल आहे तुमच्या हुशारीची ! तुमच्या ह्या हिकमतीवर खूष होऊन मीं तुम्हांला मुक्त केलं आहे ! " माझारीन कसें बसें स्वतःला सावरून म्हणाला.

" ही आमच्यावर मोठीच मेहेरबानी आहे ! " डार्टा म्हणाला, " पण आम्हांला मुक्त करण्याचं आतां आपल्या हातीं कुठें राहिलं आहे म्हणा ! "

" म्हणजे ? " माझारीन जरा विचकून म्हणाला.

" म्हणजे नाहीं नि बिणजे नाहीं, तुम्ही आतां आमच्या तावडींत आहां, जरा गडबड झाली तर नरडं घोटून टाकूं म्हटलं. " डार्टा गुरगुरला.

" आपल्याला आतां आमच्या हातून स्वातंत्र्य मिळवायचं आहे नि त्यासाठीं योग्य तो मोबदला मोजायचा आहे. " पार्थी तहाच्या गोष्टी बोलूं लागला.

पार्थोचें हें भाषण ऐकून मात्र सर्रकन् माझारीनच्या आंगावर कांटाच उभा राहिला. त्यानें डोळे फाडफाडून डार्टाकडे पाहून त्याच्या अंतःकरणाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला पण डार्टा अगदीं निर्विकार मुद्रा करून उभा होता.

" स्वातंत्र्याबद्दल मोबदला म्हणतां ? काय पाहिजे आपल्याला ? " माझारीन तहाच्या अटी हुडकण्याचा प्रयत्न करूं लागला.

" तें आम्हीं अजून कुठें ठरवलं आहे ? त्या बाबतींत ऑथाचा सल्ला घ्यावा लागेल. चलावं आपण तिकडे. " डार्टा किंचित् हुकमी आवाजांत म्हणाला. माझारीन जरा घुटमळूं लागतांच डार्टा पुढें म्हणाला, " महाराज, आम्ही शक्य तों आपला मान ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोंत पण आपण जर का निसटण्याचा अगर आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केलात तर मात्र नाइलाज म्हणून आम्हांला आपली वाचा कायमची बंद करावी लागेल ! "

" नाहीं ! नाहीं ! ! मी तसं कांहींच करणार नाहीं ! ! ! " माझारीन म्हणाला आणि त्यानें मुकाट्यानें ऑथाच्या खोलीचें कुलूप काढलें.

हें सर्व लटांबर एकदम खोलींत शिरल्याचें पाहून ऑथा चकितच झाला. " म्हणजे ह्याचा अर्थ तरी काय ? " तो म्हणाला.

" ह्याचा अर्थ जरा वेळ बदलली आहे. आतां मी तुमचा कैदी आहें. तुम्ही माझे नाहीं." माझारीन म्हणाला. " पण लक्षांत ठेवा, हें फार वेळ चालणार नाहीं. मी न बोलावतांही कदाचित् माझीं माणसं इथें येऊं शकतील."

" हां महाराज, ही दमदाटी बरी नाहीं! आम्ही किती सौम्यपणानें आपल्याशीं वागत आहोंत, पाहिलंत ना? आपण आपला संताप आवरलात तर मला वाटतं अधिक बरं होईल." डार्टा म्हणाला.

" मी मित्र म्हणूनच तुम्हांला सांगतों आहें." माझारीन बोलूं लागला, " बाहेर चौफेर सशस्त्र शिबंदीचा पहारा असतांना तुम्ही कसे निसटणार आहांत तेंच मला कळत नाहीं. एक तासाच्या आंत फिरून तुम्ही अटकेंत पडाल नि मग पस्तावाल. ह्याचा सूड म्हणून तुम्ही आतांच माझा जीव घेणार असाल तर निराळं. नाहीं तर मी तुम्हांला मोकळे सोडून देण्याची हमी घेतों. मला सोडा कसे!"

" छे, छे! एकदा तुम्ही इथून निसटलांत कीं पांच मिनिटांत आम्हांला तळघराची हवा दाखवाल!"

" पण मी तुम्हांला वचन देतों ना! माझ्या वचनावर तुमचा विश्वास नाहीं?"

" आमचा त्याला इलाज नाहीं. सध्या आहे तें खरं. ह्यांत कांहीं गडबड झाली तर मात्र आपण सारेच मरूं म्हणजे झालं." डार्टाचा हा निश्चय ऐकतांच माझारीनचे पायच लुले पडले. त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला. तो गयावया करून म्हणाला,

" थांबा, ह्या बोळाच्या शेवटीं एक दरवाजा आहे, त्यांतून बाहेर पडून मोकळ्या पटांगणांतून सरळ पुढें गेलांत म्हणजे तट लागतो. तुम्ही तटावरून उड्या मारून पलीकडे सहज जाऊं शकाल व स्वतंत्र व्हाल. शिवाय तुमच्यापाशीं हत्यारंही आहेतच. त्या दरवाजाची किल्ली मजपाशीं आहे. ही घ्या!"

" हां, ठीक आहे." डार्टा म्हणाला, " पण तेथपर्यंत तुम्हीं आमच्याबरोबर आलंच पाहिजे."

" तुम्हांला शंका असेल तर मी जरूर तुमच्याबरोबर तटापर्यंत येतों; मग तर झालं ?" थोडक्यांत प्रकरण निभण्याचें चिन्ह दिसतांच माझारीन उसनें अवसान आणून म्हणाला.

सर्व मंडळी तटापाशीं येतांच आठवण झाल्यासारखें करून डार्टा एकदम म्हणाला, " खरंच महाराज, पण ऑथा अद्याप निःशस्त्र आहे. त्याला द्यायसाठीं एखादं हत्यार पाहिजे, तें कुठें मिळेल बरं इथें ?"

" त्यांत काय अवघड आहे ?" पार्था म्हणाला, " माझारीनच्या कंबरेला असलेल्या तरवारीचा त्यांना काय उपयोग आहे ? देतील ना ते ऑथाला ती ?"

मनांत नसतांनाही माझारीनला मोठी खुषी दाखवून तरवार ऑथाला द्यावी लागली. नंतर हां हां म्हणतां तटावरून पलीकडे उडी मारून ऑथा दिसेनासा झाला. माझारीनवर नीट नजर ठेवण्यास पार्थाला सांगून डार्टा तटावर चढून बसला. " आतां पुढें ?" पार्थानें खालून विचारलें. " पुढें काय ? माझारीनना नीट उचलून इकडे वर दे. त्यांनीं गडबड केली तर मात्र मुळींच गय करूं नकोस !" डार्टानें फर्माविलें. आतां मात्र माझारीनची पुरतीच गाळण उडाली. तो ओरडणार इतक्यांत त्याचे पाय अंतराळीं झाले. आपण तटावर डार्टापाशीं केव्हां येऊन पडलों हेंही त्याला समजलें नाहीं. पार्थाच्या राक्षसी शक्तीचा हा मासला अनुभवाला येतांच माझारीनची दांतखीळ बसली.

" महाराज, आतां मुकाट्यानें इथून उडी मारून पलीकडे ऑथाच्या स्वाधीन व्हा, नाहींतर मी इथल्या इथें...."

माझारीन लटलट कांपत म्हणाला, " तुऽतुऽऽतुम्ही वऽऽवऽ वचन मोडत आहां !"

"कबूल. पण भुयारांतल्या खजिन्याची काय वाट? त्याबद्दल आपलं बोलणं अद्याप कधीं झालं आहे!" डार्टा म्हणाला. खजिन्याची गोष्ट निघतांच माझारीन पुरता चीत झाला. डार्टानें त्याला बकोटीला धरून खालीं सोडतांच ऑथानें त्याचा कबजा घेतला. तत्काळ डार्टा व पार्थाही पाठोपाठ खालीं आले. जवळच कांहीं घोडे उभे असलेले दिसतांच डार्टा तिकडे वळला. पण इतक्यांत त्याला कोणींतरी दरडावलें,

"खबरदार! घोड्याला हात लावाल तर ठार झालांच म्हणून समजा!!"

"कोण ग्रीमॉं!" दरडावणाऱ्या व्यक्तीचा आवाज ओळखून ऑथा म्हणाला.

ग्रीमॉंनें तत्काळ चौघांनाही ओळखलें. दुसरीकडे टेहळणीवर असलेल्या अरामीला ही आनंदाची वार्ता सांगण्यासाठीं तो धावतच सुटला.

थोड्याच वेळांत ऑथा, पार्था, अरामी व डार्टा ही चौकडी एकत्र जमली. फ्रान्सचा दुर्दैवी प्रधान माझारीन आज त्यांच्या तावडींत सापडला होता.





प्रकरण तेरावें

# राणीची सही व लोकपक्षाचा विजय

माझारीनचा योग्य इतमाम ठेवून त्याला आपल्या ताब्यांत कसें ठेवावें हा चौघांच्या पुढें प्रश्न होता. शेवटीं पार्थाच्या भव्य प्रासादांत माझारीनची सोय करण्याचें सर्वानुमतें ठरलें व मंडळी तिकडे रवाना झाली. एका भव्य दिवाणखान्यांत माझारीनला ठेवण्यांत आलें. त्याच्या खाण्यापिण्याची सोय एखाद्या राजाप्रमाणें करण्यांत आली होती. सर्वत्र स्थिरस्थावर होतांच ह्या सर्व मित्रांना उद्देशून माझारीन म्हणाला, " मला इथें छपवून ठेवण्याचा तर तुमचा उद्देश नाहीं ना ? "

" छे छे महाराज ! " डार्टा उत्तरला, " उलट आपला मुक्काम इथें असल्याचं आम्ही जाहीर करणार आहोंत ! "

" मग लवकरच तुमच्या भोवतीं लष्करचा वेढा पडल्याशिवाय राहाणार नाहीं ! "

" ती गोष्ट आमच्या लक्षांत आहे, म्हणूनच पारीसहून लोकपक्षाचं सैन्य आम्ही आपल्या संरक्षणासाठीं बोलावणार आहोंत. राजपक्षीय सैनिकांशीं दोन हात करण्याची त्यांना जरा खुमखुमी आहे. होऊन जाऊं द्या ! "

" राजपक्षाचं बल तुम्हांला माहीत आहे ना? लोकपक्षाचा हां हां म्हणतां बीमोड होईल."

" तसं दिसलं तर आपल्याला उचलून आम्ही लगेच दुसरीकडे नेऊं. त्याबद्दल आपण निश्चित असावं."

" समजलों! समजलों!! हें पाहा, आतां कांहींतरी तडजोडीचं बोलणं काढा. मी तुमचा शत्रु थोडाच आहें!" हे ठग पक्के आहेत हें ओळखून माझारीन म्हणाला.

" छे छे महाराज," विनयाचा आव आणून डार्टा बोलूं लागला, " आम्ही आपले मित्र आहोंत ह्याबद्दल आपणाला ..."

" पुरे! पुरे!! तुम्हांला काय पाहिजे तें एकदा चटकन् सांगा बरं, उगीच आढेवेढे नकोत!"

" ॲथा, तुमचं म्हणणं काय आहे?"

" मला स्वत:करतां असं कांहींच नको आहे. देशाकरतां कांहीं मागायचं म्हटल्यास आपल्याला तें फार वाटेल म्हणून मी कांहींच मागत नाहीं." ॲथा उत्तरला.

माझारीननें हाच प्रश्न बाकीच्या तिघांना विचारला तेव्हां अरामी म्हणाला, " लोकप्रतिनिधींच्या मागण्या राणीपुढें मांडण्यांत आल्या आहेत. त्या सर्वांना मान्यता मिळाली पाहिजे!"

" ही गोष्ट ठरल्याप्रमाणेंच आहे. तुमचं असं कांहीं मागणं असल्यास सांगा!" माझारीन म्हणाला. अरामीनें तत्काळ नार्मंडीची जहागीर मागितली. डार्टानें शिलेदारांचा पुढारी म्हणून नेमणूक करून घेतली. पार्थानें सरदारकीचा हुद्दा पैदा केला. हें सारें झाल्यानंतर माझारीन हळूच म्हणाला, " ठीक आहे, तुम्ही आपापल्यापुरतं मागून घेतलंत. लोकांच्या मागण्यांचं आतां मी पाहून घेईन."

" वाऽवाऽऽ " अरामी म्हणाला, " लोकांच्याशींही योग्य तो तह झालाच पाहिजे. हा पाहा मीं त्याचा मसुदा आणलाच आहे. महाराजांनीं त्यावर सही करावी. "

" मीं त्यावर सही करण्याचं नाकारलं तर? " माझारीन जोरानें म्हणाला.

" पुढले परिणाम भोगायला तयार व्हावं! " तितक्याच जोरानें डार्टा म्हणाला.

" माझ्या सहीला राणीनें हरकत घेतली तर? "

" त्याला मजजवळ पुष्कळ युक्त्या आहेत. " डार्टा म्हणाला. " रुईच्या किल्ल्यांतील आपला खजिना राणीसाहेबांना मिळतांच त्या कशावरही सही करतील. त्यांना आज पैशाची फार नड आहे! "

" पुरे पुरे. आणा तो तहाचा मसुदा इकडे! " अरामीनें तत्काळ कागद पुढें केला व माझारीननें कांहींही आढेवेढे न घेतां तत्काळ त्यावर सही केली. तत्काळ डार्टा सेंटजर्मेनला राणीकडे जाण्यास निघाला.

माझारीन नाहींसा झाल्याची वार्ता राणीला कळली होतीच. तिनें त्याच्या शोधार्थ माणसेंही रवाना केलीं होतीं. डार्टा अकस्मात् एक दिवस राणीपुढें येऊन उभा राहिला व त्यानें राणीची जिज्ञासा तृप्त केली. डार्टाचा हा बेडरपणा पाहून राणी थक्क झाली. डार्टाची हकीकत ऐकून होतांच ती म्हणाली,

" तुम्ही स्वतःच्या अपराधांची यादी मजपुढें वाचीत आहा ह्याबद्दल तुम्हांला कांहीं वाटत नाहीं? तुम्हांला इथल्या इथें कैद करून मी प्रधानांची मुक्तता करायला सैन्य रवाना करतें! "

" सरकार असला अविचार करणार नाहींत अशी मला खात्री आहे. कारण ह्याचा परिणाम भयंकर होणार आहे. त्यांची मुक्तता होण्याच्या

आंतच त्यांची जगांतून कायमची मुक्तता होईल! आपण असा कांहीं अविचार करूं नये असा खुद्द माझारीनचा आपल्याला निरोप आहे!" डार्टा शांतपणानें म्हणाला.

"ठीक आहे. मी तुम्हांला एकट्यालाच येथें कैद करून ठेवीन!"

"माझ्या मित्रांनीं ह्याही गोष्टीचा नीट विचार केला आहे. मी ठराविक वेळांत जर परत गेलों नाहीं तर माझारीनना पारीसच्या लोकांच्या हातीं देण्याचा त्यांचा निश्चय आहे." डार्टा गंभीरपणानें म्हणाला. त्याच्या ह्या बोलण्यानें राणी चांगलीच गोंधळून गेली. शेवटीं ती निर्वाणीनें म्हणाली,

"फ्रान्सच्या राणीला तुम्ही धाक दाखवीत आहां!"

"निरुपायानें ही गोष्ट करणं भाग आहे. माझ्या निष्ठेबद्दल सरकारना शंका असण्याचं मुळींच कारण नाहीं. जनतेचं उपाशी पोट सरकारच्या नजरेला आणावं, एवढाच हेतु आहे ह्यांत! सरकार, लोकांच्याकडे एकवार पाहा! त्यांना प्रेम द्या! सर्व सर्व तंटे एका क्षणांत मिटतील!!"

"तुमचं काय म्हणणं आहे?"

डार्टानें माझारीनच्या सहीचा कागद राणीच्या हातीं दिला. त्यावर सही करतांना फ्रान्सच्या मानी राणीला रडूं कोसळलें. तिची मनस्थिति ध्यानांत येतांच डार्टानें झटकन् कागद परत घेतला व तो नम्रपणें म्हणाला, "ह्यावर सही करण्यांत राणीसरकारना दुःख होत असेल तर मला तसा आग्रह धरायचा नाहीं. मी माझारीनना तसेच राणीसरकारपाशीं हजर करीत आहें." डार्टा परत फिरतांच राणीला उचंबळून आलें. डार्टाला परत हाक मारून तिनें त्या कागदावर तत्काळ सही केली व कागद डार्टाच्या हातीं परत देत ती म्हणाली, "मी ही सनद तुम्हांला खुषीनें देत आहें, जा, माझ्या प्रजेला खूष करा नि माझारीनला परत पाठवून द्या!"



अत्यानंदानें राणीला मुजरा करून डार्टा बाहेर पडला. थोड्याच दिवसांत राणीसुद्धा सर्व दरबारी मंडळी सेंटजर्मेनहून पारीसला परत आली.

डार्टाला राणीनें राजाच्या खास तैनातीला देऊन म्हटलें, "खरोखर मी आपल्याला कधींही विसरणार नाहीं."

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
अ. क्र. 2028 दिनांक ...
विषय बा वा क्र........

BVBK-0402824

# बाल कुमार वाङ्मय

पराभूत जय, दत्त आपटे

विज्ञान कथा,

श्रीअक्कलकोट स्वामी महाराज

गुरुभक्तिपरायण स्वामी मुक्तानंद

रॉबिन्सन क्रूसो, सुखटणकर

मनोरंजक नीतिपाठ, ग. म. वैद्य

सिंदबादच्या ७ सफरी, मराठे

गलिव्हरचे प्रवास, गोरे

जय मंगलमूर्ती, आचरेकर

सार्थ सुवचनानि, आपटे

बालकल्पना रम्यकथा १ ते ३

सदाशिव शेलार, अ. अ इंगवले

पप्पू आशा भालेकर

बाल पंचतंत्र १ ते ५ संच

छान गोष्टी, १ ते ७ द्रोडेकर संच

दिन्या मिनीची धमाल, देशपांडे

रूणं रजपूत सरदार, नाथमाधव

नी . शिले ार उषा आपटे

ास नेदं, उषा आपटे

पुढे १ २ संच

गॅदि न भागवत

गो चा तास , संच

यन

म

बुद्धिचातुर्य आणि शौर्यकथा

नाना अभ्यंकर यांनी कुमारांसाठी लिहिलेल्या मनोरंजक साहस-रहस्य कथा. सभ्य सैतान, सूडाचे रहस्य, कृष्ण कारस्थान, लपंडाव, सवाईसूड, जहरी नाग, खुनी कोण? भुताटकीचा वाडा, सोनेरी साप, जहरी नजर, मरणावर मात, दोरीचा फास, सुडाच्या नशेत, विषारी सुई, रंगेल छबू, बॉम्बचा धडाका, नटीचे रहस्य, धावते पाप.

सानेगुरुजींच्या गोड गोष्टी संच

खरा मित्र, घामाची फुले, मनुबाबा, फुलाचा प्रयोग, दु:खी, सोराब नि रुस्तुम, बेबीसरोजा, करुणा[illegible] यती की पती आणि चित्रा नि चारू.

शरीरसौष्टव, दि. मा. प्रभुदेसाई

शरीरसौष्टव या विषयात नव्याने प्रवेश करणाऱ्यांना आवश्यक साधने कोणती व ती कशी वापरावीत हे भरपूर छायाचित्रांच्या साहाय्याने समजून देणारे, १२० छायाचित्रे असलेले मराठीतील एकमेव पुस्तक पुरुषांप्रमाणेच स्त्रियांसाठीही यात चित्रे आणि भरपूर उपयुक्त माहिती दिलेली आहे शिवाय शरीरसौष्टवाचे ज्ञा [illegible] शिकवणाऱ्या व्यायाम ांची यादीही यात दिलेली आहे.